नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

११८५

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

माऊजी दप्तरी संदर्भ ग्रंथालय
35335
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 24.2.94
39
विदर्भ साहित्य संघ नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

डिसेंबर १९७४

जानेवारी १९७५

मार्गशीर्ष पौष - हेमंत अंक शके १८९६

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित; विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

अध्यक्षीय संपादन ✽ कार्यकारी संपादक : वसंत खेरडीकर

संपादक-मंडळ : डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, प्रा. सुरेश म. डोळके, प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. भी. रा. जहागीरदार, प्रा. यशवंत मनोहर.

निवड-उपसमित्यांचे सदस्य

कविता प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. या. मु. पाठक, प्रा. सौ. उषा लिमये, श्री. मनोहर चिंतामणि वझे ✽ **समीक्षा व ग्रंथपरीक्षण :** प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. मधुकर आष्टीकर, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. भा. श्री. परांजपे ✽ **संशोधन** डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. ना. कृ. शनवारे, प्रा. म. रा. जोशी ✽ **ललित लेखन** प्रा. यशवंत मनोहर, प्रा. सौ. शकुंतला खोत, प्रा. तारा शास्त्री, प्रा. म. ना. लोही, प्रा. भी. रा. जहागीरदार.

अनुक्रमणिका

विठोबा अण्णा दप्तरदार : यशवंत पाठक ३४१; भाकडपणाची कहाणी : देवीसिंग चौहान ३४५; संत नामदेव-विषयक काही शंकास्थळे : हेमंत वि इनामदार ३४८; **कविता** / कालहीन क्षण : गु. ह. देशपांडे ३५०; कविता : रमेश अ. दर्प ३५०; कर्णा, सावध हो : रंगनाथ कुळकर्णी ३५१; जनाजा : नरेन्द्र शेलार ३५१; देवदास वा. रा. सोनार ३५२; प्रश्नचिन्हांचे पर्वत : वसंत गिरटकर ३५२; कविता : सुरेश मथुरे ३५३; सांजावस्था मधुकर वाकोडे ३५३; भास : रे. भ. भारस्वाडकर ३५३; तीन अंधाराच्या कविता : अरुण म. अत्रे ३५४; संध्याकाळ : कृष्णा चौधरी ३५४; वेडी : महेशकुमार कुलकर्णी ३५४; डोळ्यातल्या सुरांना : विद्याधर भागवत ३५४; कविता : प्रकाश कामतीकर ३५५; एक कविता : भगवान सवाई ३५५; **ललित लेखन** / आश्रय भि. शि. स्वामी ३५६; आकाशाची गोष्ट : कीर्ती साठे ३६०; अपूर्णतेच्या शोधात तीन नाटके : म. ल. वराडपांडे ३६१; **परीक्षणे** / अनौरस : जयंत परांजपे ३६४; संध्याछाया राजा पाठक ३६६; निष्ठा : मदन कुलकर्णी ३६८; असे साकारले शिल्प : वसंत खेरडीकर ३६९; **कार्यवृत्त विभाग** : अठ्ठेचाळीस-पन्नास.

✽ मुखपृष्ठावरील चित्र : श्री. दि. के. मनोहर, प्रगती आर्ट्स, नागपूर.

✽ मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर आर्ट्स, नागपूर.

मूल्य दोन रुपये वर्ष ३० अंक ९-१० डिसेंबर '७४-जानेवारी- '७५

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मकर संक्रांत : १९२३
विदर्भ साहित्य संघ

पद्मश्रियाविराजित

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे



ह्यावर्षी इचलकरंजी येथे भरणाऱ्या पन्नासाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या सुवर्ण महोत्सवी अधिवेशनाच्या अध्यक्षपदी पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ह्यांची निवड झाली आहे. ह्या त्यांच्या बहुमानानिमित्त विदर्भ साहित्य संघ त्यांचे सहर्ष अभिनंदन करीत आहे.

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे आणि विदर्भ साहित्य संघ ह्यांचे स्नेहसंबंध फार जुने आहेत. संघमंदिर आणि रंगमंदिर उभारले जात असताना त्यांचे अधून मधून बराच काल नागपुरात वास्तव्य असे. त्यांच्या 'अंमलदार' या नाटकाचा पहिला प्रयोग नागपूरच्या 'नागपूर नाट्यमंडळा'ने केला होता. विदर्भ साहित्य संघाशी असलेला त्यांचा स्नेहसंबंध वृद्धिंगत होत राहो ही सदिच्छा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

दिनांक १२-१०-१९७४ च्या रामचरितमानस चतु:शती समारोहात सन्मान्य अतिथी डॉ. नगेंद्र यांचा सत्कार



डॉ. नगेंद्र, माननीय श्री. शेषराव वानखेडे, आ. रा. देशपांडे, श्री. वा. के. अत्रे

साहित्यिक मानकऱ्यांचा सत्कार समारंभ दिनांक २४-१०-७४

श्री. त्र्यं. गो. देशमुख, माननीय कृषिमंत्री बाबू जगजीवनराम, श्री. गो. स. देहाडराय,
श्री. वसंत वऱ्हाडपांडे, श्री. वा. के. अत्रे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विठोबाअण्णा दप्तरदार

यशवंत पाठक

मराठी भाषेच्या प्रारंभापासून प्राचीन काव्याचे तीन विभाग कल्पिले जातात, ते म्हणजे संत, पंत व तंत. सर्वसाधारणपणे पेशवाईच्या अखेरीपर्यंतचा काळ यात गृहीत धरतात. पेशवाईनंतरच्या काव्याचे विश्लेषण स्वतंत्र व अर्वाचीन कालखंडात केले जाते. या अर्वाचीन कालखंडातील महान भगवद्‌भक्त-पंतकाव्याची निस्सीम उपासना करणारे कवि विठोबाअण्णा होत. 'महाराष्ट्र-भाषाचित्रमयूर' कृ. ना. आठल्ये यांनी अण्णांच्या 'सुश्लोकलाघव' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे भाषांतर केले. त्यातील प्रास्ताविकाच्या आधारे त्यांचा जीवन-परिचय मिळतो (अधिक माहिती केरळकोकिळ-वर्ष-७, अंक-९). त्यांच्या नातेवाईकांकडे चौकशी केली असता दंगलीत त्यांचे संपूर्ण हस्तलिखित जाळले गेल्याचे समजते.

मोगलाईत कलवुर्ग्याच्या शेजारी वेदर या गावी त्यांचे पूर्वज रहात असल्याने वेदरे त्यांचे आडनाव. हे शांडिल्य गोत्री देशस्थ ब्राह्मण. यांचे आजोबा बाळाजी-पंत यांनी स्वकर्तृत्वाने माधवराव पेशव्यांकडून कऱ्हाडात दप्तरदारीची वंशपरंपरागत सनद मिळविल्याने स्थायिक झाले. बाळाजीपंतांना महादजी बल्लाळ व त्र्यंबक बल्लाळ अशी दोन मुले. बाळाजीपंतांच्या निधनानंतर महादजीपंत अवघ्या पंधराव्या वर्षी दप्तरदारीवर रुजू झाले. हे अण्णांचे तीर्थरूप. इ. स. १८१३ मध्ये अण्णांचा जन्म झाला (पौष कृष्ण अमावास्या-शके १७३५). शाळेचे नांव काढताच विठोबाचे रडणे सुरू. सुभेदारांच्या उपदेशाने विठोबा शाळेत जाऊ लागला. मोडी अक्षर उत्तम घटविल्याने शाळेत त्यांच्या हातचे कित्ते लागलेत. वयाच्या बाराव्या वर्षी विवाह झाला. गयाबाई हे त्यांच्या पत्नीचे नाव. त्यांना तालीम व पोहण्याचा फार नाद. कृष्णा नदी पार करून मोठमोठे दगड काठावर आणून त्यांनी बांधलेले मारुतीचे देऊळ आजतागायत आहे.

कालांतराने विठोबाअण्णा अप्पा पुराणिक यांचेकडे संस्कृत अध्ययनास जात. रघु, किरात, कुमार, माघ, नैषध ही पंचकाव्ये म्हटली. बुद्धी तीव्र असल्याने शिष्याच्या शंका गुरुला निवारणे अवघड जाई. कऱ्हाडातील कृष्णाबाईच्या महोत्सवात त्यांनी कीर्तने करण्यास प्रारंभ केला. येथे त्यांना काव्याचा उगम गवसला. 'हरि हा आनंदाचा कंद' हा ख्यातनाम कटिबंध त्यांनी रचला की जो कीर्तनकारांत अद्याप लोकप्रिय आहे. गुंडाचार्य घळसासी व नारायणाचार्य गजेंद्रगडकर या प्रख्यात वैय्याकरणांजवळ ते व्याकरण शिकले. भाषेच्या असीम प्रभुत्वामुळे शीघ्र-कवित्वशक्ती स्वाभाविक प्रकटली. त्यांच्या नावावर 'शिवस्तुती', 'गजेंद्रचंपू', सुश्लोकलाघव', 'हेतुरामायण', 'प्रबोधोत्सवलाघव', 'प्रयोगलाघव', नित्यक्रमलाघव' 'संकल्प', 'रामतापिनी', 'विवाहतत्त्व', 'साधुपार्षद लाघवम्' व 'एकादशीविचार' एवढे ग्रंथ आहेत. संस्कृत सुलभ व्हावी म्हणून 'सत्पदार्थलाघव' नामक कोश तयार केला, पण तो अपूर्ण राहिला. पेशवाईनंतर वंशपरंपरागत नोकरी गेली. परंतु सातारच्या महाराजां-कडून कारकुनीची जागा मिळाली. तिसाव्या वर्षी पत्नी निवर्तली. त्यांना सितारामपंत (बापुराव), रघुवीरराव व भवानीबाई अशी तीन अपत्ये होती. दोन वर्षांनी पत्नीमागोमाग मातोश्रींनी इहलोक संपविला. तेव्हा-पासून अण्णांनी पागोटे सोडले. आबामहाराजांजवळ वेदशास्त्रांचा अभ्यास केला. अमृतरायांपासून मंत्रोपदेश घेऊन ते पुराणिक झाले.

इ. स. १८६८ मध्ये विष्णुशास्त्री पंडित यांनी 'स्त्री-पुर्नविवाह' सशास्त्र आहे यावर वाद केला. याचा निकाल अण्णांनी देण्यासाठी ते अष्टचास राव-साहेब लिमये वकीलांकडे गेले व अभ्यासपूर्वक 'विवाह-तत्व' ग्रंथ तयार केला. संकेश्वर मठाचे शंकराचार्यां-बरोबर ते पुण्यात आले व गजेंद्रगडकरांना त्यांनी वरील विषयाबाबत पुष्कळ साह्य केले. पुण्यातील तुळशीबागेत हजारो श्रोत्यांना त्यांनी पुराण सांगितले. कुरुंदवाड, जयखिंडी या संस्थानातही त्यांचा सत्कार झाला. शेवटी अर्धांगाचा विकार झाला. चैत्र वैद्य एकादशी शके १७९५ या दिवशी ते निधन पावले. त्यांची समाधी कऱ्हाड

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येथील त्यांच्याच वास्तूत असून चैत्र वद्य एकादशीस त्यांची पुण्यतिथी साजरी होते. त्यांच्या कन्येचे नातू राजे इनामदार खटावकर यांच्या ताब्यात सांप्रत ही वास्तू आहे.

अण्णांचे काव्य अत्यंत स्वाभाविक व प्रेमाने परिपूर्ण असे. शब्दांसाठी कधी वाट पहावी लागली नाही. त्यांच्या वाणीतून जे उद्‌गार बाहेर पडत ते काव्यरूप धारण करीत. जवळची शिष्यमंडळी ते उतरून ठेवीत. सर्वच काव्यात त्यांची भूमिका आर्त भक्ताची दिसते. भक्तिरस व प्रसाद हे विशेष आढळतात. त्यांनी आपल्या काव्याचा उपयोग लोकोद्धार व आत्मोन्नतीसाठी केला, त्यामुळे त्यांच्या काव्याचे विषय पारमार्थिकच आहेत. बहुतेक काव्य संस्कृतातून लिहिले. विशेषतः 'गजेंद्रचंपू' व 'सुश्लोकलाघव' या दोन ग्रंथांत काव्यपटुत्व, रचनाचातुर्य व कल्पनाकौशल्य आहे. मात्र 'सुश्लोकलाघवां'तील कविता अण्णांनी परिश्रमपूर्वक केलेली आढळते. एकाच पदाचे वेगवेगळे अर्थ जेव्हा उलगडतात तेव्हा अण्णांच्या बुद्धिचातुर्याची कमालसीमा आहे. 'सुश्लोकलाघवां'त श्लेषाचा वापर सर्वत्र केलेला आहे. यामुळे हरिदासांच्या तीन पिढ्या त्यांच्या काव्यावर परिपुष्ट झाल्या. याच काव्यग्रंथातील नमन उदाहरणादाखल पहा–

पद्मोल्लासकरं द्विजेश्वरभृतं गोपालकं सद्‌गणैः।
संसेव्यं हरिसादरं मधुपरोत्कंठं गिरीशाश्रितम् ॥
भक्त्या नौमि निरंतरं मुरहरं लंबोदरं शंकरं।
देवं तिग्मकरं हरप्रियतरं तेजो जगत्सुंदरम् ॥

'श्रीविष्णु, गजानन, शंकर, सूर्यनारायण व शंकरास अत्यंत प्रिय असणारी त्रिभुवनसुंदरी आदिशक्तिदेवी ह्या सर्वांना सदासर्वदा नमस्कार असो' हा शेवटच्या दोन चरणांचा अर्थ. आता ह्या पाच देवता एकरूप कशा आहेत ते वरील विशेषणांचे वेगवेगळे अर्थ घेऊन समजते.

१. विष्णु कसा आहे? 'पद्म–उल्लासकरं–द्विजेश्वरभृतं–गोपालकं सद्‌गणैः संसेव्यं–हरिसादरं–मधुपरोत्कंठं–गिरीशाश्रितम्'– लक्ष्मीला आनंद देणारा, गरुडाचे पालन करणारा, धेनूंचे प्रतिपालन करणारा, सत्वतादिगण ज्याची सेवा करीत आहेत, हल्ली म्हणजे बलरामावर अत्यंत पूज्यबुद्धी ठेवणारा ('हरि'चे हली केले आहे.) मधुपर–उत्कंठं (उद्‌गतः कंठः यस्य–) मधु नावाच्या शत्रूचा शिरच्छेद करणारा आणि गोवर्धन पर्वताला धारण करणारा असा.

२. आता हीच विशेषणे गणपतीस लागतात. ज्याच्या शुंडदंडावर जाळी आहे असा, मोठमोठ्या दंतांनी युक्त, गो म्हणजे वाणी–सरस्वती हिचे पालन करणारा, 'गणानात्वां गणपति हवामहे' ह्या मंत्रात सांगितलेल्या गणांचा स्वामी, कोमल हिरव्या रंगाचे दुर्वांकुर धारण करणारा, मधुप म्हणजे भृंग हे ज्याच्या गंडातून निघत असलेल्या मदस्रावाविषयी उत्कंठित होत असून, शिवाचा आश्रय करणारा असा.

३. शंकर कसा आहे? (पद्मोल्लासकरं) पद्मासन घालून बसलेला, (द्विजेश्वरभृतं) चंद्राला धारण करणारा चंद्रचूड, (गो–पालक) गंगा नदीचे पालन करणारा, (सद्‌गणैः संसेव्यं) प्रमथादिगण ज्याची सेवा करतात असा, (हरिसादरं) विष्णूवर ज्याची भक्ती आहे असा (मधुप–रा–उत्कृष्टःकंठः) भृंग व मेघ याप्रमाणे उत्कृष्ट आहे कंठ ज्याचा असा नीलकंठ (गिरीश आश्रितम्) कैलासावर रहाणारा.

४. सूर्य कसा आहे? (पद्म–उल्लास–करं) कमलाला विकसित करणारा, (द्विजेश्वर–भृतं) चंद्राला प्रकाश देणारा, (गो–पालकम्) किरण धारण करणारा, (सद्‌गणैः–संसेव्यं) वेदादि सद्‌गणांनी पूजित असा, (हरि–सादरं) अश्व हे ज्याचे वाहन आहे असा ह्यात हरि–सादं–लं असा विग्रह करून घोड्याने गती प्राप्त होते असा अर्थ साधला आहे. येथे शेवटच्या 'र' अक्षराऐवजी 'ल' घेऊन ह्या धातूपासून लाति म्हणजे घेणारा–मिळविणारा असा अर्थ होतो. (मधुपरा–उत्कंठं) मधुपरं म्हणजे भृंग हे ज्याच्यासाठी उत्कंठित होतात असा, कमलातील मद्य मिळविण्यासाठी भृंग कमलात बसतात व सूर्यास्त झाला की ते मिटते. त्यामुळे ते अडकतात व पुन्हा सूर्योदय होईपर्यंत ते कमल प्रफुल्लित होत नसल्याने त्यांनाही सुटकेला मार्ग नसतो. म्हणून ते सूर्योदयासाठी उतावीळ होतात. (गिरीश–आश्रितम्) उदयाचलावर विराजमान होणारा.

५. आदिशक्ती कशी? (पद्म–उल्लास–करं) कमलाप्रमाणे शोभायमान आहेत हात जिचे, (द्विजेश्वर–भृतं) सुरथसमाधि नावाच्या क्षत्रियांचे व वैश्यांचे संरक्षण करणारी, (गोप–अलकं) मेघासारखे काळेशार केस असलेली, (सद्‌गणैः–संसेव्यं) ब्रह्मादि देवताही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्त्री–रूपाने जिला सेवन करतात (अशी चंडिस्तवमध्ये कथा आहे. तो हा संदर्भ येथे आहे.), (हरि–सादरं) सिंह जिचे वाहन आहे, (मधु–पल–उत्कंठं) मद्य व मांस जिला प्रिय आहेत, (गिरीश–आश्रितम्) शंकराचा किंवा हिमालयाचा आश्रय करणारी अशी. अशा पंचायतनरूपी देवतांना नमस्कार असो. असे हे पाच अर्थ.

यावरून अण्णांच्या शब्दप्रभुत्वाची साक्ष पटते. विविध विषयांचा समाचार त्यांनी आपल्या काव्याद्वारे घेतला. नवविधा भक्तीचे निरूपण हे स्वतंत्र मानावयास हवे. मोरोपंतांच्या सन्मणिमालेप्रमाणे रामदास, जयराम स्वामी, ज्ञानदेव, तुकाराम, कबीर, कमाल, सावता माळी, नामदेव, जनाबाई इ. संतांची वर्णने खास संस्कृतशैलीत केली. विशेषतः समर्थांचे वर्णनात त्यांनी गद्यकाव्यप्रकार (Prose–Poetry) कौशल्याने हाताळला. याशिवाय तंबाकू, जर्दा, मांजर, ढेकूण, पत्रे इ. विविध विषयांवर विनोदी श्लोकही रचलेत. काही श्लोकांमधून त्यांना वैद्यकशास्त्रही अवगत असल्याचे आढळते. पाणिनीच्या सूत्रांमधील श्लेष साधून त्यांनी आपली विद्वत्ता पणास लावली. येथे कवित्वापेक्षा त्यांचे रचनाकौशल्याचे परिश्रम लक्षणीय मानायला पाहिजे. व्याकरण नियमांवर किती अप्रतिम श्लेष कवीने पुढील श्लोकात साधला आहे–

भावप्रधानमस्याख्यातं यत्सत्वः परः प्रकृतेः ।
तं भज शेषगिरिस्थितमच्युतमिह शाब्दिकं वचः शुद्धयै ॥

सरलार्थ–श्रीहरीच्या नामसंकीर्तनाला भक्ती हीच प्रधान आहे. तरी त्याला वाणीही शुद्ध लागते. ह्याकरिता तू वैय्याकरणप्रवीण जो अच्युत त्याचीच उपासना कर.

पहिला अर्थ– ज्याच्या नामसंकीर्तनाला भक्ती हीच काय ती मुख्य असते. परंतु त्याचा अनुभव घेणे बुद्धीला अगम्य आहे. ह्याकरिता आधी वाणी शुद्ध होण्याकरिता शेषगिरिस्थ असा जो अच्युत त्याची उपासना कर. व्यंकटाचलावरील भगवान जो श्रीहरी तोच पूर्ण वैय्याकरणी आहे. त्याचे भजन केले म्हणजे ठीक. श, ष, स इ. वर्ण अज्ञ लोकांना उच्चारतांना फार जड जातात. ते त्यांना साधत नाहीत. ह्याकरिता त्याचेच भजन केले असता, म्हणजे तीच अक्षरे असता वाणी शुद्ध होते.

दुसरा अर्थ–आख्यात म्हणजे क्रियापद. ह्या शब्दांने काही तरी मनातील भाव प्रदर्शित केला जातो. अर्थात् आख्यात हे भावनाप्रधान असतात. त्यांना प्रत्यय मूळ शब्दापुढे लागतो. ते व्याकरण समजून घेण्यासाठी तू 'शेष' शेषाचा अवतार जो पतंजलि त्याची गिरिस्थित–वाणी, त्या वाणीचे वाक्शुद्धीकरिता वाणीच्या ठिकाणी असणारा जो अच्युत त्याचे आराधन कर.

कवीने 'सुश्लोकलाघव' ग्रंथाचा उद्देश स्पष्ट केला आहे–

सुश्लोकलाघवश्लोकं विचित्रानंददायकम् ।
सकलाः स्पृहयंत्येव हरिदासा विशेषतः ॥

ह्यातील श्लोक आनंददायी आहेत. ते सर्वांनाच विशेषेकरून (स + कला) कलायुक्त चतुर पुरुषांना तर हवेहवेसे वाटतील. हरिदासांना तर जीव की प्राण. दुसरा अर्थ–ह्या सुश्लोकलाघवातील रामचरित्र अपूर्व आनंददायक आहे ते सर्वांना पुनःपुन्हा ऐकावेसे वाटेल. हरिदासांना म्हणजे ईश्वरभक्तांना तर ते विशेषच. ज्ञात्यांनी कवीच्या काव्यात कितीही दोष काढण्यात प्रतिकूलता दर्शविली तरी स्वभावतःच निर्दोष (काव्यांचा) जो त्यांचा स्वाभाविक धर्म तो कधीच नाहीसा होणार नाही हा विचार कवीने पुढील आर्येत सहजसुंदर श्लेषाने गुंफला–

नूनं निसर्गतः कविरूढमलप्रशामने हि सरसानाम् ।
प्रतिकूलतापि न भवेदनर्थकृत्कतकवत्कदाचिदपि ॥

कवीच्या काव्यातील दोष असतील ते काढून त्यास निर्दोष करणे हा 'सरस' पुरुष, रसिक किंवा ज्ञाते त्यांचा स्वभावधर्मच आहे. ते जरी त्याच्या उलट झाले तरी 'कतक' म्हणजे निवळीच्या बी प्रमाणे त्यांचा स्वभाव बदलायचा नाही. निवळीचे बी उलटे वा सुलटे पडले तरी पाण्यातील गाळ रसातळाला जाऊन पाणी निर्मळ होणारच. तद्वत सरस लोकांनी कितीही उलट बाजू घेतली तरी 'सरस' ते 'सरस'च. ते कधीही नीरस होणार नाही. कवीचे काव्य निर्दोष करणे हा त्याचा धर्म. 'सरस' व 'कतक' या दोन्ही शब्दांवर कोटी केली. हे दोन्ही शब्द उलटे व सुलटे लिहा ते मूळ रूपाने कायमचेच. त्यांच्या अर्थात् बदल होणार नाही. त्याप्रमाणे रसिक व ज्ञाते निवळीच्या बी प्रमाणे आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अध्यात्मशास्त्रातील बहुतेक विषय अण्णांनी हाताळलेत. त्यात नवविधाभक्ती, रामनामाचे महात्म्य, निष्काम भक्तीचे महत्त्व, सगुणभक्तीशिवाय निर्गुणाचे महत्त्व ओळखणे शक्य नाही, नाममाधुर्य, नामरसाचे श्रेष्ठत्व, विष्णुपदाचे महात्म्य, विदेहस्थिती इ. विविध विषयांचा समावेश आहे. नामाचा पराक्रम रामापेक्षाही श्रेष्ठ आहे हा त्यांचा आवडता विचार. रामनामाशिवाय वाणीला शोभा नाही. मधूनच ते मनाला उपदेश करतात. मनाचा चांगुलपणा ध्यानी घेऊन त्याला गोंजारतात तर ईश्वराचे दासच बुद्धिमान असल्याचा त्यांना सार्थ अभिमान वाटतो. जगात फक्त ईश्वराशीच सख्य करणे ही उचित गोष्ट ते मानतात. 'आशा नसेल तो मुक्त' अशी त्यांची मुक्तीची लक्षणीय व्याख्या. 'याचना म्हणजे यातना', 'स्त्री–पुरुषार्थाची हानी करणारी', 'मोह हा जबरदस्त', 'द्रव्यसंग्रह करू नये' असे अनेकविध सिद्धांत समर्पक उदाहरणांसह मोजक्या शब्दात त्यांनी मांडले.

अवघ्या दोन चरणात चितारलेली संतांची शब्दचित्रे हा दप्तरदारांचा आणखी एक विशेष. उदाहरणादाखल कबीराचे वर्णन पहा—

अहो सदारामपदं श्रितस्य कुजन्मनः सद्रससंप्लुतस्य ।
समुद्भवेत्सत्सुमनस्कताऽस्य निदर्शनार्थं यवनः कबीरः ॥

पहिला अर्थ—अहो ! (सदारामपदं श्रितस्य) निरंतर ज्यांनी रामचंद्राच्या पदाचा आश्रय केलेला आहे, ते जरी नीच कुलात जन्मलेले असून ते जर (सद्रससंप्लुतस्य) ब्रह्मानंदाने भरलेले असतील तर त्या पुरुषांच्या अंगी (सत्सुमनस्कता) खरे साधुत्व कसे निर्माण होते ह्याचे 'कबीर' हे उदाहरण आहे.

दुसरा अर्थ—(सत्–आरामपदं–श्रितस्य) निरंतर सुंदर बागेत असलेल्या (कुजन्मिनः) उत्तम रसांनी भरलेल्या झाडांना फुलांचा बहार येणार नाही काय? हेच सिद्ध करण्यासाठी 'कबीर' यवन झालेत.

वेणाबाई, आनंदमूर्ति, अमृतराय, सिद्धराज, रामचंद्र पंडित, द्रौपदी, भीष्म, विदुर, इ० अलौकिकांची शब्दचित्रे त्यांनी रेखाटलीत. ज्ञानेशांच्या वर्णनात प्रासादिकपणा व श्लेष किती सहजपणे प्रतिबिंबित झाला आहे—

यद्विलासवशादात्मवस्तु नैव प्रकाशते ।
अलंदीपो विनाशाय तमसस्तस्य केवलम् ॥

ज्याच्या सहज लीलेने आत्मज्ञान प्रकाशमान होते, असा (अलंदीपः) आळंदी गावाचे पालन करणारा, तेथील रहाणारा जो ज्ञानदेव तो एकटाच त्या पापरूपी अंधाराचा विनाशकर्ता आहे. (अलं–दीपः) ढळढळीत असा दिवा तो एकटाच आहे.

आनंदतनय, वामनपंडित, मोरोपंत या पंडित-कवींचीही समर्पक स्तुती त्यांनी केली. कविकुलगुरू कालीदासाचे वर्णनात तर परमोच्च बिंदू झाला—

कालीच्या लीला जो ऱ्हस्व करी असुनि दास निजलीला ।
कवितेला जागवुनि प्रकटुनि कवि कालिदास निजलीला ॥

कालिदास हा खरोखर सेवक असूनही ह्याने आपल्या कृतीने कालीच्या लीला फिक्या पाडल्या, कारण त्याने आपण प्रगट होऊन निजलेल्या कवितेला उठवून जागे केले.

पवित्र तीर्थक्षेत्रांची वर्णने त्यांनी केली. काही श्लोकांमधून समस्या रचल्यात व त्याला बुद्धिचातुर्याधारे उत्तरे दिली. मात्र आपले काव्य लिहिताना कवीची भूमिका नम्रपणाची व काव्य हा ईश्वरी 'प्रसाद'ही आहे. कवीने काव्याचा उद्देश ईश्वर-गुणानुवाद करणे हा जरी सांगितला तरी इतर रसांद्वारे विविध विषय हाताळण्यात त्याने मुबलक स्वातंत्र्य अंगिकारले. रामभक्तीचे महात्म्य वर्णिताना इतर देवतांपेक्षा थोड्याफार प्रमाणात रामाचे श्रेष्ठत्व प्रस्थापिण्यास कवीला अधिकाधिक धन्यता वाटते. रामदासांवर विशेष भक्ती असल्याने त्यांचे शब्दचित्र लिहिताना तो अधिक एकरूप होतो व आपली प्रतिभा चातुर्याने हाताळतो. विविध विषयांचे वैचित्र्य आढळूनही त्यांच्या काव्यात रामनामाचा महिमा व पांडित्य हे विशेष आढळतात. दैनंदिन जीवनातील दृष्टांतांचा सूचकतेने वापर केलेला आहे. 'सुश्लोकलाघव' या ग्रंथाच्या शेवटी कवीने आपली भूमिका स्पष्ट केली—

हृत्पुंडरीकांतरसन्निविष्टः श्रीरामचंद्रः कुलदैवतं मे ।
यथा यथा प्रेरयदप्रमेयस्तथा तयाऽवोचमिदं समग्रम् ॥

या भूमिकेवरूनच पंतांच्या काव्याचे विवेचन केले तरच ते त्यांना न्याय देणारे ठरेल. पंतांनी कीर्तनातील पदेही लिहिलीत. पदांवरतीही स्वतंत्र टिपण तयार होईल. काही इतरांची पदे मात्र त्यांच्या नावावर आढळतात.

(पृष्ठ ३४९ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाकडपणाची कहाणी

देवीसिंग चौहान

आधुनिक आर्यभारतीय भाषांच्या भाषावैज्ञानिक अभ्यासात ज्यूल ब्लोक याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारोपीय भाषेच्या निरनिराळ्या शाखांतील तौलनिक अभ्यासाची शिदोरी पाठीशी घेऊन, बीम्स आदींनी आधुनिक आर्यभारतीय भाषांचा अभ्यास पुढे मांडला. त्याच्या पुढची पायरी एकेका भाषेचा सखोल अभ्यास करण्याची होती. कारण प्रत्येक भाषेचे भिन्न-भिन्न असे वेगळेपण निश्चित आहे. म्हणून त्या अलग अलग आहेत. हे पुढचे पाऊल ज्यूल ब्लोकने टाकले. युरोपात विकसित झालेले अभ्यासतत्त्व हाताशी होते. मराठीचा अभ्यास जवळून करता यावा म्हणून ते इ. स. १९१४ ते १९१८ पर्यंत, चार वर्षे महाराष्ट्रात येऊन राहिलेही होते. त्यानंतर त्यांनी आपला मूळ ग्रंथ फ्रेंच भाषेतून प्रकाशित केला. त्यानंतर भारतातील इतर भाषांच्या वैयक्तिक अभ्यासास आरंभ झाला. सुनीतिकुमार चाटर्ज्जी यांनी बंगाली भाषेचा उद्गम व विकासाचा शोध घेतला. सुमित्र मंगेश कत्रे यांनी कोंकणी भाषेच्या विकासाची दिशा दाखविली. बाबूराम सक्सेना यांनी कोशली (अवधी) व धीरेन्द्र वर्मा यांनी व्रजभाषा यांचे विकासप्रपंच तपासले. याच धर्तीचे प्रयत्न असामी, उडिया, गुजराती, दख्खिनी हिंदी आदि भाषांच्या संबंधात घडून आले. अशा प्रकारच्या अभ्यासमार्गाचे ब्लोक हे पथिकृत् आहेत.

मराठी भाषेच्या विकासाचा साकल्याने आवाका साधावयाचा असल्याने ब्लोक यांना, पाणिनीय संस्कृतांच्या मागे जाऊन वैदिक भाषेचा भारोपीय भाषेपासून विकास आणि याचा मराठीवर, तिच्या जडणघडणीवर झालेला परिणाम याची दखल घेणे, हाती घेतलेल्या कामाच्या मर्यादेच्या बाहेरचे होते. शिवाय हा ग्रंथ लिहिल्यालाही आता ५० वर्षे होऊन गेली. मराठीच्या अभ्यासात तदनंतर विशेष खोली निर्माण झालेली नसली तरी, भारोपीय व भारेराणी भाषा यांचा भाषा-वैज्ञानिक अभ्यास सारखा पुढे सरकत आहे. यामुळेही मराठीच्या अभ्यासावर जो वरचेवर हात फिरावा तो फिरलेला आढळून येत नाही.

प्राचीन आर्यभारतीय म्हणजे ऋग्वेद व अन्य वैदिक ग्रंथ यांत, तत्कालीन समग्र अ–संस्कृतीय प्राचीन आर्यभारतीय बोलींचा समावेश झालेला होता असे मुळीच नाही. पतंजलीच्या काळापर्यंत म्हणजे सामान्यत: इसवीपूर्व दुसऱ्या शतकापर्यंत संस्कृत बोलभाषा होती. ती भारतीय आर्यांच्या उच्चवर्गीयांची भाषा होय. परंतु याखेरीज संस्कृतच्या अन्य बोलीही होत्या. त्यांची दखल व प्रतिबिंब संस्कृत भाषेत नाही (पहा. बरो, पृ. ४५). या गोष्टीकडे विद्वानांचे आता लक्ष गेलेले आहे. स्वत: बरो यांनी ही गोष्ट संस्कृत भाषेतच एकाकी असलेल्या शब्दांची चर्चा करीत असताना मांडलेली आहे. याचा अधिक प्रत्यय, भारत–ईराणी सीमेवरील अनेकानेक ईराणी व आर्यभारतीय बोलींचा अभ्यास करणाऱ्या हारोल्द बेली व दिवंगत मोर्जेन्स्टर्न या पंडितांच्या भाषावैज्ञानिक अभ्यासांतून येतो. याच अभ्याससंपत्तीच्या आधारे बरो यांनी वरील स्थानी असा अभिप्राय नोंदविला आहे की प्राकृत, अपभ्रंश आदि भाषांत (आणि पर्यायाने आधुनिक आर्यभारतीय भाषांत) असे भरपूर भाषिक साहित्य उपलब्ध आहे, ज्याचा वैदिक भाषा व पुढील पाणिनीय संस्कृत यांच्या आधारे सगळा उलगडा करता येत नाही. याचे उदाहरण म्हणून बरो यांनी ध्वनिपरिवर्तनाची उदाहरणे चर्चिलेली आहेत. आपणा मराठी भाषिकांना स्पर्श करणारी एकच गोष्ट येथे सांगतो. महाराष्ट्रातील जुन्नर हे प्रसिद्ध व प्राचीन नगर सर्वांना ठाऊकच आहे. परंतु संस्कृत जॄ या धातूपासून साधित जूर्ण हे संस्कृत रूप वैदिक व पश्चात भाषांत ज्ञात नाही. परन्तु ते प्राकृत भाषेत जुण्ण रूपाने उपलब्ध आहे. त्याला नगर, नअर हा शब्द लागून बनलेले जुन्नर गाव आजही चालू आहे. तसेच नीड हा शब्द तद्भव असून तो पुन: संस्कृतात गेलेला आहे. त्याचे मूळ नि आणि अस् आहे, याचा सुगावा संस्कृतात नाही. इह हा तद्भव शब्द संस्कृतात आहे, पण इध या मुळाचा लोप झालेला आहे. असो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या प्रस्तावनेचा संबंध भाकड शब्दाच्या उत्पत्तीशी असल्याने हे चऱ्हाट लांबविले.

भाकड, भाकडकथा

भाकड हा शब्द मराठीत सर्वत्र रूढ आहे. गाय किंवा म्हैस उडाली म्हणजे तिला भाकड म्हणतात. भाकड म्हैस, गाय सांभाळणे शेतकऱ्यांचा जिवावर येते. अमेरिकेत तेथील सामान्य लोकांना जसा वृद्ध आई-बापांचा कंटाळा आहे, घरी ठेवून घेऊन सांभाळणे जसे त्यांना कंटाळवाणे वा अप्रिय वाटते; तसाच व्यवहार आजदेखील भारतात भाकड गाईम्हशीविषयी होत असतो. जिने दूध देण्याचे थांबविले आहे ती भाकड गाय. महानुभावीय मराठीत हा शब्द फार रूढ होता, निदान तो साहित्यात तसा होता, असे वाटत नाही. कारण तो ज्ञानेश्वरीत फक्त एकदाच वापरल्याचे, शि. न. भावे यांच्या पदकोशावरून आढळते. ती ओवी अशी–

> कां चिखलीं रुपली गाए। धड भाखड न पाहे ।
> जो तियेचिया ग्लानीं होयें। कालावुला ॥१६.१४१॥

अशी गाय अर्थोत्पादनासाठी निरुपयोगी, म्हणून व्यवहारात ती तात्पुरतीच का होईना, दुर्लक्षणीय ठरते.

बरो यांनी अलीकडे एका लेखात संस्कृत शष्प व बाष्प शब्दांची चर्चा केलेली आहे (पाहा, राएज, पृ. ११२). हे दोन्ही शब्द केवळ संस्कृताच्या आधारे व्युत्पादिता येत नाहीत, म्हणून मूळ भारोपीय भाषा व तदुत्पन्न इतर युरोपीय व भारेराणी भाषांचा त्यांनी आधार शोधलेला आहे. या भाषांतील जुन्या शब्दांवरून शष्प हा शब्द आता लुप्त असलेल्या शष शब्दापासून निघाला असे त्यांनी प्रतिपादिले आहे. वर्णविपर्ययाच्या प्रक्रियेतून हे घडले. याच प्रक्रियेतून एकाकी संस्कृत वाष्प शब्द बनलेला आहे. त्याचे मूळ रूप वाष्प होते. परंतु हा शब्द तद्भव होय. त्याचे अध्याहृत भारोपीय मूळ वाप्ष आहे, असा त्यांचा निष्कर्ष आहे.

हे उलगडून सांगताना, दृष्टांतरूपाने त्यांनी क्ष् ध्वनीच्या परिवर्तनात हीच प्रक्रिया घडते असे प्रतिपादून, ऋग्वेदात फक्त एकदाच प्रयुक्त असलेल्या बष्कय शब्दाची चर्चा केलेली आहे. ऋग्वेदात (१.१६४.५) बष्कय शब्द वत्स शब्दाचे विशेषण आहे. तो श्लोक असा–

> पाकः पृच्छामि मनसाविजानन्देवानामेना निहिता पदानि ।
> वत्से बष्कयेऽधि सप्त तन्तून्वि तत्निरे कवय ओतवा उ ।५।

सायणाचार्यांनी दिलेल्या 'बष्कयो नाम एकहायनो वत्स' एक वर्षाचे वासरू ते बष्कल होय, या अर्थाशी सहमत होत, बरो यांनी बष्कय शब्दाचा मागोवा घेतलेला आहे. या बष्कय शब्दावरून बष्कयनी हा स्त्रीलिंगी शब्द पाणिनीने एकदाच वापरलेला आहे (पाहा, कत्रे, पृ. ४०७). संस्कृत कोशांतून व कत्रे यांच्या पाणिनीय शब्दकोशांतून, वासरू लहान, तान्हे असलेली ही गाय आहे, असा अर्थ दिलेला आहे. परंतु हा अर्थ लक्ष्यार्थाने दिलेला असल्याने, तो वस्तुस्थिति निदर्शक बनू शकत नाही. कारण बरो यांनी टर्नर यांच्या आधारे (शब्दक्रम १९८१) बष्कयनी शब्दाचे तद्भव रूप, हिंदी भाषेत बकेनी म्हणजे उडत आलेली गाय व पंजाबीत वाखड, बाखड (अर्थ तोच) होय, असे सांगितले आहे. हिंदी व पंजाबी भाषांत याद्भव शब्दाचा अर्थ उडत आलेली गाय असा असला तरी मराठीमध्ये तो निव्वळ उडालेली गाय असा आहे, हे मराठी भाषिकांना स्पष्टच आहे. या दोन अर्थात थोडासा भेद आहे हे लक्ष्य आहे.

तीन आधुनिक आर्यभारतीय भाषांत बष्कयनी शब्दाच्या तद्भव रूपाचा अर्थ भाकड म्हणजे उडालेली गाय असा असल्यामुळे, पाणिनीने एकदाच वापरलेल्या मूळ शब्दाचाही हा अर्थ असावा असे म्हणावेसे वाटते. हे अर्थान्तर तीनही आधुनिक भाषांत घडून आले असे म्हणण्यास काहीच वाव नाही.

संस्कृत क्ष्, ष्क् ध्वनीपासून आपाततः चष्क ध्वनी कसा बनू शकतो याची चर्चा बरो यांनी केली आहे. बष्कय व बष्कयनी यांची कुळीमुळे त्यांना इंग्रजी वॅक्स् wax शब्दावरून दिसून आली. पोकोर्नी याने रशियन वोस्क(क्रमसंख्या ११८०) शब्द दाखवून भारोपीय वोक्सो *wokso शब्दाकडे अंगुलिनिर्देशन केले. वाक्स् याचा जुना अर्थ वाढणे, हळूहळू चंद्राच्या कलांप्रमाणे वृद्धिगत होणे असा अर्थ इंग्रजी कोशातही दिलेला आहे. हा शब्द भारोपीय असून संस्कृत वक्ष् शब्दाचा सगोत्र आहे असे पोकोर्नी आदींनी सांगितलेले आहे. वक्ष् धातूचा अर्थही तोच आहे.

आधुनिक ईराणी भाषेत वश्कारी म्हणजे शेती, पिके काढणे अशा अर्थाचा शब्द आढळून येतो. याचा सं. वक्ष् धातूशी संबंध आहे असे यावरून दिसून येते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसेच वष्खोर असा पश्तो भाषेत दुसरा शब्द आहे. दुसऱ्या प्रांती त्याचा वख्खोर असाही उच्चार होतो, ष् व ख् अशी उच्चारांची परिवर्तनीयता जुन्या मराठीतही चालू होतीच. वख्खोर, वष्खोर याचा अर्थ तृणजीवी, गवत खाणारा प्राणी असा आढळतो (पाहा, बेल्लिव). वष्कय हा शब्द पशुपालन करणाऱ्या समाजांतील विशिष्ट शब्द आहे असे बरो यांनी म्हटले आहे (पृ. ११७). पश्तो भाषेतील अवशेषावरून गवत खाऊन वाढणे असा वक्ष् धातूचा मूळ किंवा लक्ष्य अर्थ होता, ही गोष्ट पुढे येते. याने पशुपालन क्षेत्रातील या शब्दाच्या अर्थाला या अर्थच्छटेने अधिक भरीवपण येते. वष्खोर हा पश्तो शब्द वष्कय या ऋग्वेदीय शब्दाशी जवळीक वाळगणारा आहे असे सहज दिसून येते.

आता ऋग्वेदात आलेल्या वष्कय शब्दाचा अर्थ अधिक बारकाईने पहाणे शक्य आहे. गाय हळजल्यावर साधारणत: महिन्या–दोन महिन्यात वासरू गवत खाऊ लागते. त्याला गवतावरच राहाता येण्यास किमान चार–पाच महिने लागतात. अशा वेळी गाय चांगली दूध देणारी असते. गाय साधारणपणे एका वर्षाच्या आतच गाभा जाते. हा काळ ८–७ महिन्यांचाही असतो. असे जर झाले तर तिचे वासरू केवळ तृणजीवी झालेले असते. त्याला आईच्या दुधाची गरज राहात नाही. यावरून वष्कय या शब्दाचा मूळ अर्थ तृणजीवी वासरू असा घेणे अत्यंत युक्त होईल. अशा वष्कय शब्दावरून बहुव्रीही अर्थाने बष्कयनी (किंवा वष्कयिनी) असा शब्द सिद्ध होऊन अशी गाय–जिचे वासरू गवतावर जगते असा त्याचा अर्थ होईल. आता संस्कृतात एकाकीपणे वावरणारा वष्कयनी आणि पश्तो भाषेतील वष्खोर (म्हणजे तृणजीवी पशु) हे शब्द किती जवळचे आहेत याचा बोध होतो. वष्कयनी शब्दाची नोंद करणारा पाणिनि पख्तुनिस्तान या पश्तो भाषेच्या मातृप्रदेशात सुवास्तु (ऋग्वेद ८.१९.३७), आधुनिक स्वात नदीच्या खोऱ्यातील शलातुर येथे राहाणारा होता, हेही लक्षात घ्यावे. जिचे वासरू गवतावर जगायला लागते, ती गाय गाभा जाऊन उडायच्या वाटेला लागते. वासरू एक वर्षाचे–एकहायन झाले म्हणजे गाय गाभण होऊन उडालेली असते, ती भाकड झालेली असते. ही ज्ञानेश्वराची भाकड गाय होय. वरील चर्चेच्या अनुरोधाने पाहिल्यास, वष्कय शब्दाचा एकहायन वत्स हा अर्थ अगदीच लक्ष्यार्थ आहे. मूळ अर्थाचा सुगावा वरती घेतलेलाच आहे. वष्कयनी म्हणजे भाकड गाय हाही पर्यायापर्यायाने आलेला आहे. तोही लक्ष्यार्थच. परंतु, तृणजीवित्व हे वष्कयनीचे वैशिष्टय. हे वैशिष्टच तिला वासरावरून संश्लिष्ट झाले. निष्कपनि ती भाकड म्हणजे दूध न देणारी होय. अर्थात् या शब्दाची व्युत्पत्ती वक्ष् या वाढणे, गवत खाऊन वाढणे, या धातूपासून आहे, हे सिद्ध होते.

भाकड कथा लावणे असा वाक्प्रचारही मराठीत रूढ आहे. तो वरील प्रकारच्या भाकड गाईच्यावरून रूढ झाला हे उघड आहे. गाईकडे माणूस केवळ अर्थोत्पादनाच्या दृष्टीने व्यवहारात कसा पाहातो हे ग्रामीण जीवनाची जवळून कल्पना असणाऱ्यांना सहज कळते. यामुळेच भाकडकथा हा अनुभवप्रत्ययी वाक्प्रचार रूढ झाला.

संदर्भ व संक्षेप

डिक्शनरी ऑफ़ पाणिनि, मु. मं. कत्रे, पुणे १९६८.

द संस्कृत लँग्वेज, ती. बरो, लंदन, १९६५.

द जर्नल ऑफ रॉयल एशियतीटिक सोसायटी, लंदन, १९६९.

डिक्शनरी ऑफ् पश्तो लँग्वेज, बिलिव, लाहोर, १९०१.

□ □

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संत नामदेवविषयक काही शंकास्थळे

हेमंत वि. इनामदार

ज्ञानदेव–नामदेवादी मध्ययुगीन मराठी संतांच्या चरित्राचा आणि साहित्याचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी विश्वसनीय व पुरेशी साधनसामग्री उपलब्ध नसल्यामुळे या अभ्यासात अनेक अडचणी उत्पन्न होतात. संत नामदेवविषयक अभ्यासामध्ये काही शंकास्थळांचा परिहार करणे अवघड आहे असे जाणवले. ती शंकास्थळे जाणकारांच्या विचारासाठी येथे दिली आहेत.

१. इतरेतर आश्रय

संत नामदेवांचा जीवनपट आणि त्यांचे काव्य यांची निश्चिती करताना इतरेतर आश्रय घेतला जाण्याची पदोपदी शक्यता आहे. म्हणजे असे की, अधिकृत जीवनचरित्र उपलब्ध नसल्यामुळे सांप्रदायिक गाथेतील अभंगांवरून नामदेवांचे चरित्रचित्र उभे करावयाचे; आणि त्याच चरित्राच्या साहाय्याने त्यांच्या काव्याची संहिता ठरवावयाची, अशी आपत्ती ओढवते.

२. आत्मचरित्रकाराची भूमिका

नामदेवांना गुरुस्थानी असलेले ज्ञानदेव हे स्वतःच्या वाङमयात आत्मोल्लेख फारसा करीत नाहीत. स्व–जीवनासंबंधी शक्य तेवढे मौन पाळणे हे जुन्या काळात बहुरूढ व शिष्टसंमत होते असे एकीकडे मान्य केले जाते, पण तरीदेखील नामदेव प्रांजल असे आत्मकथन करतात; आणि त्यातून स्वतःच्या जीवनवृत्ताचे मनमोकळे निवेदन करतात, असेही अभिमानाने म्हटले जाते. या दोन्ही भूमिका परस्परविरोधी आहेत. पुन्हा असे की, 'नामा म्हणे' या नाममुद्रेने प्रसिद्ध असलेले आत्मचरित्र खरोखरच नामदेवकृत असेल, तर त्याच्या आधारे मांडलेल्या, जन्मस्थान–जन्मकालादी नामदेव-चरित्रातील गोष्टी वादग्रस्त का राहाव्यात, त्याचा उलगडा होत नाही.

३. नामदेवांचा अनुल्लेख

नामदेवकृत चित्रकरणात्मक ज्ञानदेवचरित्र (आदि, तीर्थावळी व समाधी) नामदेवगाथेत आढळते. नामदेव हे ज्ञानदेवांचा उल्लेख अनेक ठिकाणी करतात; पण ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव–पासष्टी व ज्ञानदेव–गाथा यांपैकी कोणत्याही ग्रंथात ज्ञानदेवांनी मात्र नामदेवांचा निर्देश कोठेही केलेला नाही. या अनुल्लेखाचे कोडे उलगडत नाही.

४. एकानेकत्वाचा प्रश्न

नामा पाठक, नामा यशवंत, विष्णुदास नामा, महानुभावीय नामदेव शिंपी व ज्ञानदेवकालीन नामदेव अशा अनेक नामदेवांचे नामनिर्देश व त्यांची कविता सांप्रदायिक गाथेत सापडते. नामदेवांच्या एकानेकत्वाचा हा प्रश्न त्यांच्या मराठी रचनेपुरताच मर्यादित आहे काय ? त्यांच्या नाममुद्रेवर आढळणारी हिंदीतील समग्र रचना ('गुरुग्रंथसाहेब'तील एकसष्ठ दोहे व अन्य स्फुट हिंदी पदे) ही खरोखर कोणत्या (वा कोणकोणत्या) नामदेवांची आहे ?

५. नामदेवांची पंजाबयात्रा

नामदेवांनी पंजाबात प्रवास केला व घुमान येथे त्यांनी काही काळ वास्तव्य केले हे त्यांच्याविषयीच्या हिंदी लिखाणांवरून व गुरुग्रंथसाहेबातील त्यांच्या दोह्यांवरून मानावे लागते. पण खुद्द नामदेवांच्या मराठी कवितेत त्याचा उल्लेख मात्र सापडत नाही. तसेच नामदेवकालीन अन्य मराठी संतकवींनीही याविषयी काही म्हटलेले नाही. इतिहास–ग्रंथांतूनही या पंजाबयात्रेची साथ सापडत नाही. मराठीप्रमाणे, हिंदी-मध्ये नामदेवांचे आत्मवृत्तही नाही. या त्रुटींचा खुलासा करणे अवघड आहे.

६. जनाबाईंचे वास्तव्य

संत जनाबाईंसारखी एक शूद्र स्त्री नामदेवांच्या घरी राहिली होती, असा गाथेत पुरावा मिळतो. तिचे हे वास्तव्य कशा स्वरूपाचे असावे ? ते प्रमाण माना-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वयाचे का ? नामदेवकालीन वा नामदेवोत्तरकालीन एकाही संताच्या जीवनात असे उदाहरण घडलेले नाही. (आजही ते दुष्प्राप्य आहे.) तेव्हाच्या चातुर्वर्ण्याच्या चौकटीत हे वास्तव्य कसे बसले ?

७. जीवनपटातील 'पोकळी'

नामदेवांच्या चरित्राविषयीच्या उपलब्ध साधन-सामग्रीवरून त्यांचा समग्र जीवनपट उलगडून दाखविता येत नाही. ज्ञानेश्वरांच्या समाधीपासून नामदेवांच्या समाधीपर्यंतच्या अनेक घटना आजही अज्ञात वा अल्पज्ञात राहिल्या आहेत. नामदेवांची सर्व काही मराठी रचना पंजाबयात्रेच्या आधीची की तदनंतरची, हे निश्चयाने सांगता येत नाही.

८. कुटुंबियांची कविता

नारा, महादा, गोंदा, विठा व आऊबाई या नामदेवांच्या अपत्यांची कविता व जनाबाईंची रचना सांप्रदायिक गाथेत आहे. तेथे त्या त्या अभंगकर्त्याची स्पष्ट नाममुद्राही आहे, पण नामदेवांचे वडील दामा शेटी, आई गोणाई व पत्नी राजाई यांच्या नावांवरील अभंगसंहितेस स्वतंत्र स्थान देता येईल काय, असा प्रश्न आहे. 'दामा म्हणे नामयासी' किंवा 'गोणाई म्हणे वहु ठक होसी' अशा शब्दांत, त्या कुटुंबियांचे म्हणणे खुद्द नामदेवांनीच प्रत्यक्ष निवेदनपद्धतीने केले असावे, अशी शंका येते. या प्रश्नाची अधिक छाननी होणे जरूरीचे आहे.

समारोप

संत नामदेवांचे जीवनचरित्र, त्यांची काव्यसंहिता, त्यांच्या कुटुंबियांची कविता, ज्ञानेश्वरांचा त्यांना घडलेला सहवास इत्यादी विषयांचा निर्णयात्मक शोध घेणे काही ठिकाणी अशक्यप्राय होते. नामदेवाभ्यासातील जे महत्त्वाचे प्रश्न अद्यापही अनुत्तरित राहिले आहेत, त्यांचे दिग्दर्शन येथे केले आहे.

'युगवाणी' च्या वाचकांनी या शंकास्थळांवर काही प्रकाश टाकला तर मी आभारी होईन.

□ □

[पृष्ठ ३४४ वरून]

त्याचे संशोधन होणे आवश्यक. परंतु संस्कृत रचना त्यांची मुबलक असल्याने त्या काव्याद्वारा त्यांचे या टिपणात दर्शन घडविण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. परंतु एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष यातून असा काढता येईल की पंडिती काव्याच्या सर्वमान्य वैशिष्टयांसह व गुणदोषांसकट विठोबांअण्णाचे काव्य असून, त्याचा उपयोग प्रामुख्याने नारद सांप्रदायिकांच्या कीर्तनकारांनी अद्यापही केला आहे व त्यातील प्रासादिकतेने तो पुढे होईल यात संदेह नाही असे विधान केल्यास अतिशयोक्ति होणार नाही असे वाटते.

[या टिपणाचे कामी 'सार्थ सुश्लोकलाघव' या भाषांतरकार आठल्ये यांच्या ग्रंथाचा मौलिक उपयोग झाला.]

□ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ क वि ता ॥

काल हिन क्षण : गु. ह. देशपांडे

‘देवाचिये द्वारी’
राहुनीया ऊभा
पाहीले मी आंत
शून्य गर्भगृहा !
पोकळी पुढे त्या
टेकीयला माथा
असते पणाची
उरे परि व्यथा !
काही असण्याची
जोपासिली आस
लागेना परंतु
काही ते हातास !
गाभाऱ्याबाहेर
निघता रिते
हरवून आलो
मनच तेथे !
येरझारा पायीं
आयुष्य क्षीण
साघेना परंतु
काल हीन क्षण !

* *

कविता : रमेश अ. दर्प

शिल्पस्थ तळ्याचे पाणी
मरणाची त्यावर छाया
चाहूल कुणाची येता
अस्थीस धुक्याची माया

वितळले धुक्यामधि काठ
दूरचा उदासिन माळ
उधळले जिवाचे घोडे
क्षितिजावर उसळे जाळ

निष्पर्ण तरुंच्या खाली
किती मरून पडली पाने
मौनस्थ दुःख दुखणारे
जे सांगितले पाण्याने...

कोरीत धुक्यातुन वाट
कुणि अनाम येतो पक्षी
पाण्यात पंख मिटताना
मरणावर उठते नक्षी...

* *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कर्णा, सावध हो ! : रंगनाथ कुळकर्णी

कर्णा, सावध हो !
जमाना शल्यांचा आहे आज.

मंजूर नाही कुणाला
कवचकुंडलांचं दान

योगक्षेमाचा प्रीमियम भरल्यावर
उरली तर ठेवतात चिल्लर
देखण्या भिकारणीच्या हातावर
सर्वस्व झोकून देऊन
लावणे प्राणांची बाजी
मंजूर नाही कुणाला आज.

शिखंडीच्या आडून शरसंधान करणारे
आधुनिक अर्जुन
धनुर्धर ठरतात विनासायास
' नरो वा कुंजरो वा '
हा चालू मंत्र आहे.
खुर्ची मिळवण्याचे; टिकवण्याचे
जुने तंत्र आहे नव्या डगल्यातले
आणि
' सत्याचे प्रयोग '
ग्रंथात बंदिस्त झालेत
त्याग करणारे करून गेले
बूज नाही लेकुरवळ्यांना
भोग भोगतात बेशरम
बापाचे देखील श्राद्ध उरकतात चटावर.

निष्ठेचे पाप मंजूर नाही कुणाला आज
पक्षांतरातच उद्धरतात बेचाळिस कुळे
बहुरंगी डोमकावळ्यांची.
शल्याचा विजय असो !
शल्यनीतीचा जयजयकार करा !!
सावध हो कर्णा—
सतत चालले आहे रथचक्र
विरत चालला आहे घोष
' मदायत्तं तु पौरुषम् '
मंजूर नाही कुणाला आज
झेप धडाडी !—लाचार लबाडी
अधिक किफायतशीर, अधिक सुरक्षित.
खंत नको कर्णा, खंत नको
जमाना असाच असतो
महाभारताच्या काळात देखील
कर्ण एकटाच असतो !

* *

जनाजा : नरेन्द्र शेलार

तू दिलेली अग्निफुले
माझ्या रक्तात
विझून गेली आहेत
मला ऐकू येत नाही
तुझी निर्भय गर्जना
उठतात विजेचे लोळ
त्वचेवर.
माझ्या भयग्रस्त हृदयात
आदळतात आक्रोश
आभाळात भटकणाऱ्या
बेइमान ढगांचे
काटेरी झुडुपे उगवतात
माझ्या डोळ्यात
पुन्हा एक सूर्यास्त
पुन्हा तोच अंधार
गळ्यात गळा घालून
कुणाच्या वाटून घ्यावे
मी माझे जन्मदु:ख
माझाही अंतिम उत्सव
इथेच होईल...इथेच
ह्या दरवाजेबंद तुरुंगात
माझ्या नाउमेद आकांक्षांचा
जनाजा
मलाच उचलला पाहिजे आता
अथवा
माझ्याच पराभवाची गिधाडे
तुटून पडतील माझ्यावर
अंधार होण्यापूर्वी !

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देवदास : दोन कविता : वा. रा. सोनार

: १

या पहाडाच्या माथ्यावर
कधीपासून कर्जासारखे भुईकोट किल्ले.
छातीत वेळू रुतावे तसे उंच मिनार.
युगांपासून मन पोखरीत जावे तशी भुयारे
पहाड कधीचाच शापित हाकेसारखा.
एक दिवस पहाडावर वेल उगवली.
थोडी उन्हे हसून गेली
राघूंनी दरीतुन शीळ दिली.
पहाडाच्या छातीवर वेल उगवली.
पहाट–फकीर पहाड जागवतो
" साजणीबाई, सांगू म्या काई
डोळ्यात जाई कैसी उगवली...
...अंतरीची धून कैशी जागवली "
आता पहाड आलोचन जागत बसलेला
त्याला ही वेलही कुरवाळता येत नाही,
जगवायची म्हणून
छाती फोडणारी वेल !

: २

किती करुण असते सये,
स्वतःतून तुटत तुटत जाणे
किती करुण असते,
केसातून हात गळून पडणे
किती करुण रे,
रडून सुजलेले डोळे ओलीस ठेवणे
किती करुण असते
कवितेचं काजळडोळा देखणे
किती करुण अरे,
कफनीत काळजाची धडधड करणे
किती करुण बये,
एकांतात स्वतःला शोधीत जाणे
किती करुण हे
तुम्याच गावात पुनःपुन्हा येणे
किती करुण याहून
प्रेयसीच्या गळ्यात चिणलेली हाक
इथे हातावर कापुरी आणभाक
किती करुण...किती करुण.

* *

प्रश्नचिन्हांचे पर्वत : वसंत गिरटकर

कपतान कसलेत...
कारवान कूच करील
कमरेच्या कसन्या घेऊन

घडी जवळ आली
सराईची सराईत ओढ.
त्याची जुनीच
जन्मभर जोपासलेली
मेली खोड

म्हणशील आता : ऊठ सोड !
वखत उरलाच नाही
घडीतच घडा
फुटून जाईल !

उंटांवर लादल्या जातील
तंबूंच्या कनाती
पाण्याच्या पखाली घ्या भरून
भविष्यात येतील कामी...

हुजूर !
हा खजूर कशाला ?
हुक्क्याचा हक्कच उडाला आहे
ओलाव्याच्या जागांतही
ओल उरली नाही.

दूर दूर क्षितिजांचा विस्तार
विस्तारत आहे–

या वाळवंटाच्या महासागरापुढे...
काय असेल ?

– मनाला लावतात कवत
अगणित प्रश्नचिन्हांचे पर्वत !

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता : सुरेश मथुरे

पावसाळे आले... गेले...
दोन मुले ओळंबली
फ्रीज–मिक्स घेता घेता
नवी कळी खोळंबली

पावसाळे येता येता
मासावर मास आले
डिस्पेशिया, पायोरिया
श्वासानाही वास आले

पावसाळे जाता जाता
स्थैर्य आले, धैर्य आले
पथ्य पाणी चिंता व्याधी
आगे मागे खडे झाले

काळे काळे ढग आले
निळ्या निळ्या सरी आल्या
ओल्या ओल्या आठवणी
टोव्हीतून घरी आल्या.

* *

गाव : मोहन पाटील

पार तसाच पडलेला
पिंपळाची दाट छाया
अजून शेंद्या मारुतीची
गावावर तशीच माया
मायलेकींचे बोलणे
डोळे ओले हुंदक्यांनी
निळ्या ओढ्याच्या धारेची
शिळ भिनते कानोकानी
अजून तुक्याच्या अभंगाला
गेला नाही भंग
अजून विणेच्या तारातून
माझा विठ्ठलही दंग
अजून माझ्या मनातून
आठवणींचा पूर येतो
दाट धुक्याच्या थराखाली
गाव कधी बुडून जातो

* *

सांजावस्था : मधुकर वाकोडे

: १

उसवला मुईगर्भ कवडसा टाके मारी
सांज दिशेच्या नेसूची वांझ पाणावली निरी.

: २ :

काळबनातील सांज उभी गोंदवून गाल
पापणीच्या काळी निळी मनी चुकचुके पाल.

: ३ :

दिशा घेतात वळण किती टाकू सांजमुठी
उंडारता क्षितिजाशी झाल्या सैरमैर गाठी.

* *

भास : रे. भ. भारस्वाडकर

सगळ्या रात्रभर दार वाजवण्याचे भास होताहेत
डोळा लागतो न लागतो तोच
कानाशी सरपटणारा गिळगिळीत आवाज
दूरवर माशांचे मोहळ उठल्यासारखा
सतत झिरपत जाणारा...

अरण्य उशाला घेऊन
श्वापदांनी श्वासांची लय साधलीय्.
तुम्ही रक्तहीन क्रांतीसंबंधी वाचले आहे काय ?
मन चुरगळताना
रक्ताचा एक थेंबही बाहेर येत नाही.

सरकीपासून अलग होणाऱ्या
कापसासारखा मी आतून पिंजल्या जातोय्
घडीभर आशांचे पांढरे पुंजके सरकताहेत
नजरेसमोरून...

आतमध्ये खोलवर झालेली जखम
न सुकणारी...
हळू हळू झिरपत जाणारी शरीरभर
तीव्र वेदना.
सगळ्या रात्रभर दार वाजवण्याचे भास होताहेत.

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तीन कविता अंधाराच्या : अरुण म. अत्रे

१

माध्यान्हीचा सूर्य, सुना सुना
गेला मावळतीकडे उतरून
ऊन्हं हसली गालात
अंधार माझ्यावर पसरून

: २ :

अश्रूंचे पक्षी निघाले
डोळ्यांचे घरटे सोडून
मला गिळताना अंधारालाही
आलं गहिंवरून.

: ३ :

आयुष्यच निसटलं हातातून
जशी वाळू निसटावी.
ओहटीच्या समुद्राला साक्षी
ठेवून अंधाराची गाची गाथी.

* *

संध्याकाळ : कृष्णा चौधरी

एक न उमलणारी, न फुलणारी
उदास मन, उदास नभ, ओंजळीत रित्या
अर्घ्य मावळत्या गडद सांजरंगाचे
अवकाश...पुढे भित, पुढे भित अवकाश...
मी कधीचा आपटतोय डोके भितीवर रक्ताळून
नियतीच्या वरवंट्याखाली भरडले जाणारे
अमल अजाण जीवजंतु...
काहींना मात्र मिळाला आहे म्हणे।
तुझ्याकडून पूर्वीच ' पासपोर्ट '
प्रश्नांनी प्रश्न वाढतो
उत्तर कधी गवसतच नाही
हे कृपासिंधू !
मला विरघळून टाक ना तुझ्या अजस्र मिठीत
प्रश्न निर्माण होण्याआधीच.

* *

वेडी : महेशकुमार कुलकर्णी

जेंव्हा तू पाठमोरा दिसतो ना !
तेंव्हा वाटतं,
असंच धावत जाऊन,
तुला मिठी मारावी,
पण भिती वाटते.
पाठमोरा दिसणारा तो,
तूच आहेस ना ?
अन जेंव्हा तू समोरून येतोस,
तेंव्हा माझी मी मलाच विसरून
जाते,
थरथरल्या ओठातून,
शब्दच बाहेर पडत नाही,
तेंव्हा चटकन असं वाटतं,
आता तू पाठमोरा असता तर–
तर किती बरं झालं असतं !

* *

डोळ्यांतल्या सुरांना : विद्याधर भागवत

स्वरमुक्त गायनाचा ओढा सुकून गेला
मीही घरात माझ्या अंधारलो भुकेला

जेंव्हा समेत होती कारुण्यशी पहाट
नजरेत मंद तारा झाला हळूच ओला

कोणी दुरून माझ्या उष्टावल्यात ओळी
होतो दुपारचा मी पसरून दीन झोळी

पाठीवरी क्षणांचे वनपंख झाकलेले
वाकून मी भुईशी सूर्यास्त झेललेला

मी पाहुणा कुणाचा कोठून येथ आलो
नाडीवरी कुणाच्या मी रक्तभार झालो

आता असेच जगणे नक्षत्रशा गतीने
डोळ्यांतल्या सुरांना आता दुरावलेला.

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत : १९२३
विदर्भ साहित्य संघ

कविता : प्रकाश कामतीकर

शपथेच्या वाटांना निश्वासाचं कोडं असतं
सावल्या झाडांच्या उतराई असतात
आणि तसा काट्यांना फुलांचा द्वेष नसतो
पायांना वाट ओळखीची असली
तरी गतीला वळणावर थबकावेच लागते
मरून आलेल्या ढगांना बरसण्याचा शापही असतोच
डोळ्यांना बघण्याचे भान असते
आणि सूर्याला उगवण्याचे
काळोखाला प्रकाशाची पुण्याई मान्य नसली
तरी त्याला झांकोळण्याचे सामर्थ्य असते
श्वासांना वाऱ्याची ईर्षा वाटते
पंखांना उडण्याची दिशा असते
पाण्याच्या निळाईला आकाशाचा द्वेष असतो
एकेकाची एकेक अशी संवय असते
फक्त शपथेच्या वाटांना निश्वासाचं कोडं असतं
श्वासांनी फुलवलं तरी
निश्वासांनी कोमेजणारं !

* *

एक कविता : भगवान सवाई

सभोवतालच्या अनोळखी चेहऱ्यांनी घेरावून मला
चिमूटभर श्वासासाठी कंगाल केले
ओठांनीच फुटक्या शब्दात विकत घेऊन मला
नंग्यांनी, त्यांच्या दुनियेत नागवे केले

पायाखालची मातीच काय ती आता आधाराला
अपेक्षिलेले सगळेच आभाळ फाटून गेले
फरशी सलाम घालणाऱ्याचा संसार वाढत गेला
नी जे बुटाचे बंद बांधून जगले ते मुखावत गेले
आता माझा मीच ओरबाडून तटस्थ चेहऱ्याला
पांगलेले मन जाळून टाकले...

* *

□ □

सूचना

- 'युगवाणी 'चा प्रत्येक अंक टपाल–कार्यालयाचे प्रमाणपत्र घेऊन पाठविला जातो. तरी अंक न मिळाल्यास आमच्याकडे पत्र पाठविण्यापूर्वी कृपया, आपल्या टपाल–कार्यालयात चौकशी करावी.

  अंक शिल्लक असल्यासच पुन्हा पाठविता येईल.

- बरेचदा अपुऱ्या वा चुकीच्या पत्त्यामुळे अंक गहाळ झालेले दिसतात. तरी संबंधित व्यक्तींनी आपापले योग्य पत्ते 'सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीतावर्डी, नागपूर ४४००१२' या पत्त्यावर पत्र पाठवून कळविण्याची कृपा करावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत: १९२३
विदर्भ साहित्य संघ

आश्रय

भि. शि. स्वामी

'सदा!' माडीवरून करडा आवाज आला. पायऱ्यावर बसून पेंगणारा सदा खडबडून जागा झाला. उठून फाटकाकडे पळाला.

'सदा!' माडीवरून पुन्हा करडा आवाज आला. आता सदाला समजले की, आवाज माडीवरून येतोय्. बाहेरून नाही. तो परत फिरला आणि भयभीत होऊन पायऱ्या चढू लागला.

'मूर्खा जेव्हा पहावे तेव्हा झोपतोस. झोपण्यासाठी ठेवला तुला?'

सदा नुसताच उभा.

'उभा काय राहिलास? चालता हो. आम्हाला तुझी आवश्यकता नाही. तू माणूस तरी आहेस का? अपशकुनी मेला.'

सदा नुसताच उभा.

'जातोस की, बोलावू यांना?'

सदा लटपटलेला परंतु तसाच उभा.

'अहो! जरा काठी घेऊन या.'

यावेळी मात्र सदा परत फिरला. जड पावलाने पायऱ्या उतरायला लागला. परंतु इतक्यात बाजूच्या खोलीतून जाडेला गृहस्थ मलमलचा सदरा आणि हातातली काठी सावरत आला. खेकसला. तार–स्वरात म्हणाला.

'तुला सांगून कितीतरी दिवस झाले. हे ध्यान मुळात पांढऱ्या पायाचं. उगाच ठेऊन घेतलंस्. बेटं दारात बसलं तेव्हापासून झोपतंय्. आला तेव्हापासून मला इकडे सतत धंद्यात नुकसान येत आहे.'

एवढं आपल्या बायकोला ऐकवल्यावर त्याने सदाकडे दृष्टी वळवली.

'अरे ये! असा निवांत काय चाललास पाय घड्यावरून चालल्यासारखा? चल पळ! नाहीतर घालतो डोक्यात काठी. पुन्हा इकडच्या बाजूला फिरकू नकोस.'

सदा पळत सुटला. थेट फाटकाच्या बाहेर. बाहेर आल्यावर प्रथम त्याने आपली अर्धी चड्डी वर खोचली. डोक्याची जखम चाचपली ऐवज चाचपल्यासारखी. आणि चालायला लागला. रस्त्यातली प्रचंड गर्दी तो पाहत होता. रिक्षा, सायकली, मोटारी, टापटीप कपड्यातले लोक यांपैकी कोणीच त्याला त्याच्या जगातलं वाटत नव्हतं. तो रस्ताही त्याला आपलासा वाटत नव्हता. म्हणून शक्य तोवर लौकर तो चालला होता. पुढे त्याला एक लंगडा भिकारी दिसला. त्याला आधार मिळाल्यासारखे वाटले. त्याने आणखी वेग वाढवला. त्याला वाटले, त्या लंगड्याच्या लुळ्या पायाला मिठी मारावी. त्या पायालाच विलगून लोंबकळत रहावं. परंतु प्रत्यक्षात त्याने तसे केले नाही. नुसताच त्याच्या बरोबरीने चालत राहिला. लंगडा त्याच्याकडे बघत होता. लंगड्याला काहीतरी वाटले. तो उभा राहिला. सदाही उभा राहिला. क्षणभराने लंगडा चालायला लागला. सदाही चालायला लागला. पुन्हा लंगडा उभा. सदाही उभा.

'काय नाव तुझं?'

'सदा.'

'कुटं चाललास?'

'कुटं नाइ.'

'कुटून आलास?'

'त्या ऽ बंगल्यातून.' त्याने बोट दाखवून सांगितले.

'बंगल्यात काय करीत व्हतास?'

'सांगत्याल त्ये.'

'मंग का आलास?'

'मारत्यात,' त्याने डोक्याच्या जखमेला स्पर्श केला.

लंगड्याने सुस्कारा टाकला. चालायला लागला. चालता चालता विचारलं, 'कशापाई मारत्यात?'

'आपसकुनि मनत्यात.'

'लंगडा उभा राहिला. त्याने सदाकडे निरखून पाहिले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘आता कुटं जानार ?’

‘तुमच्या बरवर.’

लंगडा गुपचुप चालायला लागला. सदाही चालायला लागला. कोणीच काही बोलले नाही. एक मंदीर लागलं. चारी बाजूने रस्ते आणि मधोमध मंदीर. दर्शनाला गर्दीच गर्दी. मंदीरासमोर उन्हांत दोन्ही बाजूने भिकाऱ्यांची रांग. लंगडा एका रांगेत बसला. सदाही त्याच्या बाजूला बसला. लंगडा म्हणाला, ‘त्या वळीला बस. त्या तुंडचा आंदळचापासी.’

सदा उठला आणि पुढच्या रांगेत बसला.

लोकांची दर्शनाला दाटी होत होती. सदा पाहत होता. एक हमाल नारळाचे तुकडे वाटीत आला. सदाने हात पसरला. त्याच्या हातात तुकडा पडला. त्याने तो तोंडात टाकला. समोरचे, शेजारचे भिकारी ‘मला !’ ‘हिकडं द्या !’, ‘आमी न्हायलाव.’ असे ओरडत होते. हमाल निघून गेला. दुसरा माणूस काही न देताच निघून गेला. एक स्कूटर थांबली. दोघं उतरली तो पुढे आणि ती मागे दर्शनासाठी जायला लागली. सदा पाहत होता. ती दोघे पुढे गेल्यावर त्याने स्वतःच्या अंगाकडे बघितलं. फाटक्या बाहीच्या सदऱ्याला गुंड्या नसल्यामुळे त्याची काळी घामट घाणेरडी छाती उघडी पडली होती. त्याने ती झाकून घेण्याचा प्रयत्न केला. पुन्हा तो वर पाहू लागला. ते जोडपं परतलं. भिकाऱ्यांनी हात पसरले. पसरलेल्या हातात पैसे पडत होते. सदाने हात पसरला होता. परंतु त्याचे डोळे पैशाकडे नव्हते. तो पैसे टाकणाऱ्या त्या खांद्यापर्यंत उघड्या हाताकडे आणि त्याच्या आसपास पाही आणि लगेच स्वतःची घाणेरडी छाती उघडी पडली नाही ना ? याची खात्री करून घेई. या छंदात त्याचा बराच वेळ गेला. स्कूटरवाले स्कूटरवर निघून गेले. सदाने आसपास पाहिले. त्याला नवल वाटले. फाटका परकर सावरीत त्याच्याजवळ एक पोरगी बसली होती. एक हात खांद्यापासून तुटलेला कान फाटका. बाकी धड होती. त्याच्यापेक्षा वयाने किंचित कमी असेल. सदाने तिच्याकडे वळून पाहिले. फाटक्या झंपरावरून दृष्टी फिरवीत फिरवीत त्याने आपले डोळे तिच्या छातीवर स्थिर केले.

‘नवाच दिसतोस ?’

तिच्या आवाजाने सदा शुद्धीवर आला. त्याने पुन्हां स्वतःच्या छातीवरचा सदरा सावरला आणि म्हणाला, ‘व्हय.’

‘हितं कसा काय आलास ?’

‘त्या लंगड्यानं आनलं.’

‘काका मन.’

‘तुजा काका हाय त्यो ?’

‘त्याला सारे काकाच मनत्यात.’

कोणीतरी पैसे वाटत आला तिकडे त्यांचं लक्ष गेलं. तो गेल्यावर सदा म्हणाला, ‘तू कुनाबरवर आलीस ?’

‘मी काय नवी हाय ? इकटीच आल्ये.’

‘रोज हितं इतिय ?’

‘रोज हितं का हाय ? आज एक दिस आमदानी व्हत आसतीय !’

‘मग रोज कुटं जातीस ?’

‘वारावर हाय. कंच्यावारी कंच्या द्यावळांत गर्दी आसतिया ती ठाव हाय मला.’

‘रोज वायल्या वायल्या द्यावळांत ?’

‘तसं काय न्हाय. गर्दी आसल तितं.’

‘मला कसं कळंन ?’

‘काय ?’

‘कवा कुटं जायचं ?’

‘तू लई नवा दिसतोस ?’

‘व्हय.’

‘आदी काय करीत व्हतास ?’

‘बंगल्यात व्हतो.’

‘तितं कसा गेलास ?’

‘भाकर मागत फिरत व्हतो. बंगल्यावाली मनली, धडधाकट हायस. काम कराया मरतोस काय ? म्या मनलं, काम द्या. करतो. ती मनली, न्हा. न्हायलो.’

‘मग का आलास ?’

‘मारत्यात.’

इतक्यांत कोणी पेढ्याचे तुकडे वाटत आला.

‘मला द्या !’, ‘मी न्हायलो !’, ‘आव बाबा, हिकडं द्या की !’ त्यांत सदा आणि ती मुलगी सुद्धा मिसळून गेली. पेढे वाटणारा निघून गेला. पुन्हा सदा म्हणाला, ‘मला तू दावचिन ?’

‘बरं हाय.’

‘तुजी-माजी भेट कुटं हुईल ?’

‘तुला कुटं जायचया ?’

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'कुटं न्हाई.'

'मग हितली गरदी झाल्यावर आपुन जाऊ.'

'बरं हाय.'

मग सदाने एक लांब स्वास सोडला. कोणी भीक घालायला येतो किंवा काय ते तो पाहू लागला. ती त्याच्याकडे पाहत होती. बारीक बघत होती. मग ती त्याच्याकडे सरकून बसली. काही वेळाने दोघे मिळून हसायला लागले. दोघे मिळून, 'आमाला, आमाला,' म्हणत भीक मागायला लागले. एकजण सदापुढे आला. म्हणाला, 'ऐ ! सांग. झिरो कि दुर्री ?'

सदाला काहीच समजेना. तो नुसताच बघत बसला. तो गृहस्थ पुन्हा म्हणाला, 'लवकर सांग.'

सदाला काहीच समजेना. त्या पोरीने त्याला ढोसले. म्हणाली, 'सांग की.'

सदा म्हणाला, 'जिरो.'

त्या भल्या गृहस्थाने खिशांत हात घातला. सदाने आणि तिने हात पसरले. दोघांच्या हातावर चार-चार आणे टाकून तो निघून गेला. नंतर तिने आपल्या जवळचे सगळे पैसे खाली पसरून मोजले आणि म्हणाली.'

'चल झाली आजची भरती.'

'आजची भरती ?

'व्हय. रोज दोन रुपये हुइस्तवर मागायचं.'

'दोनच का ?

'दादाला देया.'

'कोन दादा ?'

'चल. तुला दाविते.'

ती उठली. तो उठला. दोघे चालायला लागले. थोडे अंतर गेल्यावर तिने त्याला विचारले, 'तुज्या जवळ किती जमले ?'

त्याने मूठ उघडून तिच्या समोर हात पसरला. तिने मोजले. म्हणाली, 'पांच पैसे कमी रुपाया.'

त्याने पुन्हा मूठ आवळली. ती म्हणाली, 'चल. आपुन जिलबी खावू.'

'चल.'

दूर अंतरावरल्या एका झोपडीतल्या हॉटेलासमोर ती दोघे उभी राहिली. हॉटेलवाल्याने हटकले.

'जिलबी द्या.' ती म्हणाली.

'पैसे ?'

सदाने मूठ उघडली. तिने त्यातले आठ आणे दिले. हॉटेलवाल्याने कागदात बांधून जिलबी दिली. दोघे जिलबी खात खात निघाले. जिलबी संपली. तिने विचारले, 'तुजं पोट भरलं ?'

'व्हय.'

'आज द्यावळाम्होर लय खाया मिळालं. माजं बी पोट भरलं.'

थोडं अंतर गेल्यावर ती म्हणाली, 'तू हितच उबाऱ्हा. झाडाच्या बुडाला. मी आता येते.'

'कुटं निगालीस ?'

'त्या ऽ कमानीत दादा आसल. त्याला पैसं देते.'

'मी येतो.'

'नग. दादा बगल.

'तू म्हागारी इथीन नव्ह ?'

'द्यावाच्यान ईईन.

तो झाडाच्या बुंध्याशी उभा राहिला. ती गेली. तो तिला जाताना पाहत होता. कमानीजवळ ती गेली. आता त्याला ती अस्पष्ट दिसत होती. कमानीतून एक जाडेली व्यक्ती झोकांड्या खात आल्यासारखी वाटली. थोड्या वेळाने कमानीतून आलेली व्यक्ती परत कमानीत गेल्यासारखी वाटली. ती सदाकडे यायला निघाली. सदा तिला जवळ येताना पाहत होता. जवळ आल्यावर ती म्हणाली, 'चल.' तो चालायला लागला. चालता चालता त्याने विचारले, 'आता कुटे जायचं ?'

'आता झोपाया जायचं.'

'कुटं झोपायचं ?'

'त्या ऽ तितं मसान हाय. मसानांत समादी हायत. समादिच्या आडुस्याला झोपायचं. वारं बी लागत न्हाय. काय न्हाय.'

ती दोघं स्मशानांत आली. चांदण्याच्या प्रकाशांत सगळ्या समाध्या दिसत होत्या. काही समाध्यांना वळसे घालून ती एका लांब-रुंद समाधीजवळ आली. तिच्या मागून तो येत होता. तिने हाताने खालची जागा साफ केली. एक दगड उशाशी घेतला आणि झोपली.

तो तिच्या बाजूला पडला.

'हितक्या लांब का ? जवळ ये.'

तो जवळ सरकला. तिने आपला एकुलता एक हात त्याच्या अंगावर टाकला आणि त्याला अधिक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत: १९२३
विदर्भ साहित्य संघ

जवळ ओढले. त्यानेही आपला हात तिच्या अंगावर टाकला. त्याला आपल्या सदऱ्याच्या गुंड्या तुटल्यामुळे उघड्या पडणाऱ्या छातीची आठवण झाली. स्कूटरवरून उतरलेल्या त्या जोडप्यातील बाई त्याला दिसायला लागली. त्याचा हात फिरायला लागला. ती त्याला आधिक बिलगली. थोड्या वेळाने तिने त्याला विचारले, 'तुजं नाव काय ?'

'सदा.'

'तू भीक मागाय येत जाऊ नगूस.'

'का ?'

'तू धडधाकट हायस.'

'मग ?'

'मग काय ? तुला धडधाकट न्हायचं न्हाई ?'

'भिक मागितल्यावर धडधाकट न्हात न्हाई ?'

'मी बी धडधाकट व्हते.'

'मग ?'

'मग काय ? त्या दादानं मला तुंडी केली. लय पाया पडले. तवा एक हात ठिवला.'

'का तुंडी केली ?'

'भिक मागायचं सूडून निगाले व्हते मून.'

'मी न्हाई भीक मागायचं सूडून जायचा. मग बी मला धडधाकट न्हाऊ देयाचा न्हाई कां त्यो दादा ?'

ती त्याला आधिक बिलगली. त्याचं डोकं आपल्या छातीत दाबीत ती म्हणाली, 'तू लई नवा हायस. तुला न्हाई कळायचं. मी सांगते तसं कर.'

त्याला जाणवलं की, आपल्या डोक्यावर तिचे अश्रू पडताहेत. तो म्हणाला, 'तू रडतीस ?'

ती गप्पच राहिली. त्याला आधिक बिलगली. त्यानंही तिला आधिक जवळ ओढलं. थोड्या वेळानं ती म्हणाली, 'तू उद्यां सकाळचंच ठेसनात जा. हमाली कर. काय मिळन ती मिळन. न्हाय मिळलं तर न्हाय मिळलं. मी तुला न्हाय उपाशी ऱ्हावू द्यायाची. पन भिक नकू मागाया इवू. एकना एक भिकारी दादाच्या डोळ्यात हाय. उद्या तुज्यावर बी त्याचा डोळा पडल. आन्.'—

'आन् काय ?'

'मग हात–पाय धड न्हाईत न्हायाचं. नकूच पन. तू नकू भिक मागाया इवू. मी जास्ती भिक गोळा करीन. दादाचं दोन रुपयं दिवून उरलेलं आपून खावू. मी सांच्यापारी म्हागारी येताना भाकर तुकडा बी मागन. तुला खावू घालीन. तू जमल तितकी हमाली कर. आपून रोज रातच्याला हितंच भेटत जावू.'

'बरंय. तसचं करू. मी हमाली करीन. मला हमाली जास्ती मिळाया लागली तर तूबी नकू भीक मागाया जाऊ.'

आणि तिने त्याच्या पायावर पाय टाकला.

□ □

लेखकांना विनंती

- 'युगवाणी'साठी साहित्य पाठविताना– ते कागदाच्या एका बाजूवर, सुवाच्य अक्षरात व मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखननियमांनुसार लिहिलेले असावे.
- निर्णयासाठी पुरेसे टपालहशील सोबत पाठविणे आवश्यक आहे.
- नापसंत साहित्य परत पाहिजे असल्यास पुरेसे टपालहशील लावलेले पाकीट साहित्यासोबत पाठवावे. त्यावर स्वतःचा पूर्ण पत्ता लिहिलेला असावा.
- साहित्य – स्वीकृतीसंबंधीचा निर्णय साधारणतः दीड–दोन महिन्यात कळविला जाईल.

– संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आकाशाची गोष्ट

कीर्ती साठे

आकाश हल्ली शहरी होत चाललंय्. तुमच्या माझ्यासारखंच.

नाही पटत ? जरा आठवून बघा, सकाळचं स्वच्छ, ताजं, कोवळं आकाश. रात्रीच्या झोपेनं हुशारलेलं, आजच्या दिवसाचे बेत आखणारं. सकाळी सहा वाजता रणछोडदास चाळीवरचं आकाश खडबडून जागं होतं. सबंध दिवसाचं रूटीन नजरेसमोर येताच विषादानं, काळजीनं किंचित राखी रंगाचं होतं.

पण मोनिका सोसायटीवरचं आकाश मात्र अजून ढगांच्या उबदार दुलईतच आळसावून पडलेलं असतं. सूर्याचे किरण फारच सतावू लागले, की नाराजीतच दुलई बाजूला करून आळोखे पिळोखे देत जागं होतं—

सकाळचे नऊ वाजून गेले तरी आकाशाचं 'होमवर्क' संपलेलं नसतं. आणि मग त्याची एकच धांदल उडते. रस्त्यावरच्या वाहनांचे आवाज, दुकानं उघडण्यासाठी वरखाली होणाऱ्या शटर्सचा खडखडाट, 'आई जातो ग' म्हणून ओरडत तिसऱ्या मजल्यावरून दाणदाण पावलं वाजवत उतरणाऱ्या आणि धावत-पळत बस गाठणाऱ्या बाल-चमूच्या गोंधळात आकाश कुठच्या कुठे हरवून जातं. दहाचा किंवा साडे-दहाचा भोंगा झाला, की आकाशही आपल्यासारखंच दचकून घड्याळात बघत असावं, वेळेवर पोचण्यासाठी पुढच्या अर्ध्या तासात कराव्या लागणाऱ्या लढाईचा हिशेब जमवत असावं, कारण काही वेळ त्याचा उत्साही निळा चेहरा त्रासून पिवळसर व्हायला लागतो—कोणत्यातरी बसच्या मागच्या दांड्याला लोंबकळत या अर्ध्या तासात आकाश कुठूनतरी कुठेतरी चाललेलं असतं. या वेळात मान वर करून पाहिलं तर खरंच फक्त एक पोकळी दिसेल तुम्हाला—पण तेव्हा आपल्याला मान वर करायलाही वेळ नसतो म्हणा—आणि याचाच फायदा घेऊन तेही वेटं जरा हिंडून घेतं—

अकरा वाजता शाळांच्या घंटा घणघणायच्या आंत छोटी छोटी दप्तरं आणि पावलं वर्गात पोचली, निरनिराळ्या कचेऱ्यांमधे मस्टरवर तांबडी रेघ यायच्या आत सह्या केल्या गेल्या, कुठल्यातरी अनामिक दिशेला धावत अनेक इमारतींत शिरत रस्त्यावरची गर्दी नाहीशी झाली, की 'हुश्श' म्हणत आकाश एक निश्वास सोडतं, आणि वाऱ्याची मंद झुळूक खात फतकल घालून ऐसपैस बसतं. दिवसातली निम्मी धावपळ संपलेली असते. आता हालचाल असते फक्त 'डवाऽ यटलीय्—'वाल्यांची, सकाळची कामं उरकून दुपारची धुणीभांडी करायला जाणाऱ्या मोलकरणींची आणि दुधाच्या रांगेतल्या गृहिणींची—नजर लागेल असा निळा रंग भर दुपारी आकाशाला आलेला असतो. पण 'काय मेल्या उन्हाच्या त्रासामुळे' कुणीसुद्धा त्याच्याकडे बघत नाही. शेवटी, शिस्तबद्ध उभ्या असलेल्या इमारतीच्या रांगांतून बोटं फिरविता फिरविता आकाशाला चक्क डुलकी लागते, ती चार वाजता 'चिल्ड्रेन्स स्कूल'च्या गाडीतून खाकी युनिफॉर्ममधल्या छोट्या छोट्या चिमण्या खाली उतरेपर्यंत.

शहराच्या बाहेर मुकाटपणे वाहणाऱ्या नदीवर, धोब्यांच्या कपडे धोपटण्याच्या साथीत, नदीच्या पाण्यानं तोंड धुतल्यावर आकाशालाही शाळा, ऑफिसं सुटण्याचे वेध लागायला लागतात. इतक्या वेळ मरगळलेल्या त्याला जरा तरतरी येते. पेनाला टोपण लावून मग ते चक्क नदीच्या पाण्यात आपलं प्रतिबिंब पहात बसतं—

त्या नादात, रस्त्यांवरची गर्दी कधी वाढली, हे त्याच्या ध्यानातही येत नाही. घराकडे धावणाऱ्या माणसांच्या धक्क्यांनी ते भानावर येतं, आणि 'सॉरी—' पुटपुटत अंग चोरून बाजूला उभं राहतं. पण आताही कुणाचं त्याच्याकडे लक्ष नसतं. सकाळी गेलो त्याच्या विरुद्ध दिशेने आता प्रत्येकाची धावपळ सुरू असते. कधीकाळी दिलेली वचनं खुशाल विसरून जावीत, तसा प्रत्येकजण सरळ घराची वाट धरतो. पण आकाश ते फारसं मनावर घेत नाही. ते आता संध्याकाळच्या

[पृष्ठ ३६२ वरून]

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अपूर्णाच्या शोधात तीन नाटके....

म. ल. वराडपांडे

नियतीशी व स्वतःशी चाललेल्या संघर्षात व्यक्तीला कधीतरी अचानक आपल्या अपूर्णत्वाची, 'आधे-अधुरे'पणाची, जाणीव होते. साक्षात्कारासारखी. मग तिचे अंतर्विश्व ढवळून निघते. ती व्यक्ती एक संवेदनशील कलावंत असेल तर अधिकच उत्कटतेने. मग आपल्या कलाकृतींमधून ती या अपूर्णतेचा शोध घेऊ पहाते. वेगवेगळ्या पातळ्यांवर. मोहन राकेश यांची तीन नाटके याच मानवी अपूर्णतेच्या शोधात टाकलेली तीन पावले आहेत.

मोहन राकेश. भारतीय रंगभूमीच्या वाटचालीतील एक अर्थपूर्ण पदचिन्ह ! पंचेचाळीस वर्षाच्या आयुष्यात त्यांनी तीन नाटके काय ती लिहिली. परंतु आपल्या कलाकृतींनी हिंदी रंगभूमीच्या विकास-प्रक्रियेला नवी दिशा दिली. रंगभूमीवर समर्थपणे राहू शकणाऱ्या नाट्यकृतींचा अभाव दूर करण्याचा प्रयत्न नव्या पिढीतील नाटककारांनी चालविला होता. मोहन राकेश यांची नाटके १९५८ पासून रंगभूमीवर यायला लागल्यापासून या प्रयत्नाला भरीव स्वरूप प्राप्त झाले. त्यांची नाटके फारशी कृतिप्रधान नाहीत. माणसाचे भावविश्व, त्यातील अंगभूत ताणांसह जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी कलात्मक पातळीवर केला. माणसाच्या भावविश्वाशी निगडित असलेली ही नाटके आहेत. त्यांनी आपल्या नाटकांमध्ये ज्या आंतरद्वंद्वाची चित्रणे केली ती, तपशीलापासून दूर केल्यास, मूलभूत स्वरूपाची असल्याची दिसून येतात. त्यामुळे त्यांच्या तीनही नाटकात समान सूत्र दिसून येते. मानवी अपूर्णतेची सलत राहणारी जाणीव, त्याचा 'आधे-अधूरे'पणा, नियतीशी व स्वतःशी चाललेला त्याचा अविरत संघर्ष व त्याचा अटळ आणि केविलवाणा पराभव यांचे संकुल चित्रण त्यांच्या नाटकांमधून दिसून येते. त्यांची ही तीन नाटके एका बीजभूत जाणिवेची, क्रमाक्रमाने प्रगल्भ होत गेलेली तीन रूपे आहेत.

'आषाढ का एक दिन' हे मोहन राकेश यांचे रंगभूमीवर आलेले पहिले नाटक. त्याचा नायक आहे कालिदास. लेखकाला तो जाणवला आहे सृजनात्म शक्तीचे प्रतीक म्हणून एका कलावंताच्या व्यक्तित्वाची सूक्ष्म स्पंदने यात त्यांनी नोंदली आहेत, काहीशा काव्यात्मतेनेच. स्वतःच्या मनाविरुद्ध, प्रेयसी मल्लिकेच्या आग्रहाने आषाढाच्या एका ओल्या दिवशी राजदरबाराच्या निमंत्रणावरून आपले निसर्गसुंदर पर्वतग्राम सोडून कालिदास उज्जयनीला जातो. माणसातील गुण त्याच्या एक चतुर्थांश व्यक्तित्वाची निर्मिती करतात तर उरलेल्यांची पूर्ती प्रतिष्ठेद्वारा होते म्हणून. आतापर्यंत अभावपूर्ण जीवनाची स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणून. हिणवणाऱ्यांना सन्मानाने दिपवून टाकण्यासाठी म्हणून. अभावपूर्ती होते, पण हवी असलेली पूर्णता ? सन्मान मिळतो पण सहज-सौंदर्यास्वाद देखील त्याला दुर्लभ होतो. त्याच्या जीवनाची दुसरी अवस्था सुरू होते. राजकन्येशी विवाह होऊन काश्मिरचा शासक म्हणून तो काश्मिरला जातो. तरीही तो अस्वस्थ आहे. थकलेला पराभूत झालेला कालिदास सत्ता आणि प्रभुतेचे बंधन तोडून परत आपल्या गावी मल्लिकेकडे परत येतो. आषाढांच्या मेघांसारखे अंतरात जे काही दाटून आले आहे ते मोकळेपणे व्यक्त करण्यासाठी; पुन्हा नव्याने जीवन जगून पहाण्यासाठी. परंतु काळ थांबलेला नसतो. मल्लिका पूर्वीची असून पूर्वीचीच राहिली नसते. कालिदास पुन्हा एकदा पराभूत होतो व आल्या पावलीच आषाढाच्या काळधाभोर पर्जन्यरात्री पुन्हा दूर निघून जातो.

राकेशांचा कालिदास कोमल, अस्थिर आणि अंतर्द्वंद्वाने पीडित आहे. पूर्णतेच्या मागे धावताना उरी फुटून गेलेला एक घायाळ कलावंत आहे. प्रतिष्ठेविना तो अपूर्ण आहे; प्रतिष्ठेसह तो अपूर्ण आहे. त्याची प्रेयसी मल्लिका, एक ग्रामबालिका. कालिदास तिचे सर्वस्व आहे. आपल्या जीवनाचे मोल देऊन ती त्याला पूर्णता आणू पहाते. कालिदासाचे असाधारणत्व तिला जाणवले आहे. त्याच्यासाठी ती स्वतः असाधारण होते इतकी की तिचे कोमलपण निग्रही व्यक्तिमत्व संपूर्ण नाटकाला व्यापून रहाते. नाटक घडते तेच मुळी तिच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घरात. राकेशांच्या नाटकांचे हे एक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या तीनही नाटकांच्या केंद्रस्थानी स्त्री आहे. ती प्रकृत्ती–स्वरूप आहे. त्यांची पुरुषपात्रे तिच्या प्रभाव-चक्रात येतात, बाहेर फेकली जातात किंवा नुसती गरगरत रहातात. परंतु मल्लिकेचा त्याग देखील त्याला पूर्णत्व आणू शकत नाही. तीही अपूर्ण रहाते. अभावग्रस्त रहाते. अपूर्णतेच्या जाणिवेची छाया संपूर्ण नाटकावर पसरलेली आहे. संवादा–संवादातून ती व्यक्त झाली आहे.

राकेशांचे दुसरे नाटक आहे ' लहरों के राजहंस '. या नाटकाला देखील एका बौद्धकालीन संस्कृत काव्यगत कथेचा आधार आहे. राकेशांची पहिली दोन नाटके त्यांच्या संस्कृत काव्यनाटकांच्या अध्ययनातून स्फुरलेली आहेत. अभिजात वाङमयाचा त्यांचा व्यासंग अध्ययना-पुरताच मर्यादित नव्हता. त्यांनी काही संस्कृत नाटके रंगभूमीवर आणली होती. वेणीसंहारासारख्या नाटकात भूमिका केली होती. परंतु या कथांना एक नवा अर्थ देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. एका नव्या संदर्भात त्यांनी घटनांचा अन्वय लावण्याचा प्रयत्न केला.

' लहरों के राजहंस ' ही सुंदरी आणि नंद यांची बुद्धयुगीन कथा आहे. परिस्थितीच्या व स्वतःच्या मानसिक अंतर्द्वंद्वावर हेलावणारे हे दोन राजहंस. राजपुत्र नंद हा सिद्धार्थाचा सावत्र भाऊ. सुंदरी त्याची पत्नी. सिद्धार्थ ' बुद्ध ' होऊन अनेक वर्षांनी राजधानीत परत आले आहेत. सुंदरी नंदाला आपल्या सौंदर्याच्या जाळचात गुंतवू पहाते तर बुद्ध त्याला दीक्षा देऊ पहतात. सुंदरी त्याच्यासाठी कामोत्सवाचे आयोजन करते; तर बुद्ध त्याचे केशवपन करून त्याला संघात आणू पहातात. परंतु नंद मात्र स्वतंत्र बुद्धीने आपला मार्ग चोखाळू पहातो. या संघर्षाचे असे हे तीन बिंदू आहेत. कोणाचाही सिद्धांत स्वीकारून जगण्याचे नंद नाकारतो, पण स्वतः प्रयत्न करून त्याच्या हाती येते ती अपूर्णतेची हतवल करणारी जाणीवच. सुंदरीचे सौंदर्य अपूर्ण आहे, बुद्धाचा संन्यस्त मार्ग अपूर्ण आहे, आणि नंदाचा शोधही अपूर्ण. मानवाची चिरंतन अस्थि-रता नंदाच्या रूपाने मूर्त झाली आहे. त्याची समस्या ही एक मूलभूत समस्या आहे. नंद एके ठिकाणी म्हणतो, ' ज्या दिशेने जावे तीच मुळी आपल्या केंद्राधारावर

[पृष्ठ ३६० वरून]

तयारीला लागलेलं असतं. मूडात असेल तर आकाश भगदी बहार उडवून देतं अशा वेळी – गुलाबी काय, जांभळा काय, आणि मधेच डोकावणाऱ्या निळ्या रंगाच्या असंख्य छटा काय – काही विचारू नका ! रोज संध्याकाळी ते एकटंच रंगपंचमी साजरी करत बसतं. तेव्हा मात्र इमारतींच्या सुळक्यांमधून, खिडकीच्या चौकटीतून दिसणारा आकाशाचा तुकडाही ऐन भरात आलेला असतो. दोन घटका सगळी दुःखं विसरण्याचं सामर्थ्यंही त्याने आपल्याकडूनच घेतलेलं असतं.

–हळूहळू अंधार पडू लागतो. दिवसभर अखंड किलबिलाट करणारी पाखरं झाडांवरच्या घरट्यात, नाहीतर जिन्याखालच्या किंवा गॅलरीतल्या वळचणीत नाहीशी झालेली असतात. दिवसाचं सूप वाजवतांना अचानक आकाशाच्या लक्षात येतं, आजही कुणी आपल्याकडे पाहिलं नाही, कुणाला वेळही मिळाला नाही, आपल्यासाठी काही क्षण राखून ठेवायला – हा विचार येताच आकाश मनोमन उदास होऊन जातं, नेहमीप्रमाणेच. शहराच्या शोभिवंत बागांमधल्या झाडांची सळसळही त्याचं सांत्वन करू शकत नाही. ते झपाटचानं काळवंडत जातं. उपेक्षिलं गेल्याच्या जाणिवेनं ते काळंठिक्कर पडतं.

–एव्हाना चंद्र बराच वर आलेला असतो. कुणी चुकार चांदण्याही चमकत असतात. आणि अशा वेळी, सहज गॅलरीत आलेला कुणी नवविवाहित सहज आकाशाकडे बघतो, आणि पहातच राहतो. काळ्या मखमलीवर चुकून धक्का लागून हिरे सांडावेत तसं ते दृश्य पाहून आतल्या आत कुठेतरी हलतो, आणि आपल्या पत्नीला हाक मारतो, " सुमे, हातातलं काम टाकून असशील तशी धावत बाहेर ये, आकाश बघ काय ' सुपर्ब ' दिसतंय–"

आणि त्याची पत्नी बाहेर यायच्याही आधी गाढ समाधानात आकाश झोपी गेलेलं असतं !

□ □

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डगमगताना दिसते. तुटलेल्या नक्षत्रासारखं वाटतं मला. कोठेही गेलो तरी अपूर्णतेची जाणीव मला सोडत नाही. इथे गेलो काय किंवा तिथे गेलो काय!'

कालिदासालाही मानवी अस्तित्वाची हीच अपूर्णता अनंत अर्थानें जाणवली होती. स्वग्रामी तो प्रतिष्ठेविना अपूर्ण राहिला. उज्जयनीला तो प्रतिष्ठेसह अपूर्ण राहिला. परत येऊन नव्याने जीवन जगण्याचा त्याचा प्रयत्न दरम्यान न थांबलेल्या काळाने अपूर्ण ठेवला. नंदाची कथाही हीच आहे. सुंदरीच्या सौख्यमय विलासी सहवासात अपूर्णतेची जी जाणीव त्याला व्यापून राहिली होती ती त्याला बुद्धाच्या संन्यस्त सहवासातही सोडून गेली नाही. मानवी अपूर्णतेचा शोध हीच त्यांच्या या दोन्ही नाटचकृतींची मूलभूत दिशा राहिली. या दोन नाटकांत 'विकसित झालेल्या या कल्पनेचे परिणत स्वरूप त्यांच्या तिसऱ्या नाटकात दिसून येते. त्याचे नावच मुळी 'आधे–अधुरे' आहे.

'आधे–अधुरे' हे मोहन राकेश यांचे नाटक म्हणजे केवळ हिंदी रंगभूमीवरील एक नाटक न राहता त्याला अखिल भारतीय पातळी प्राप्त झालेली दिसून येते. गेल्या दशकात नाटचक्षेत्रात एक नवी संश्लेषणात्मक प्रवृत्ती प्रगट होऊ लागली आहे. ती म्हणजे भाषेची बंधने बाजूला सारून एका व्यापक स्तरावर भारतीय रंगभूमीचा होऊ पहाणारा उदय. या बाबतीत विजय तेंडुलकर, बादल सरकार, चि. त्र्यं. खानोलकर, गिरीश कर्नाड यांच्या बरोबरच मोहन राकेश यांचेही योगदान महत्त्वाचे आहे. त्यांचे 'आधे–अधुरे' हे नाटक अनेक भारतीय भाषांत गेले. या नाटकाने मोहन राकेशांना भारतातील प्रथम श्रेणीच्या नाटककारांत नेऊन बसविले. या नाटचकृतीत पुराण किंवा इतिहास–कथांचा आश्रय सोडून आपल्या संवेदनशीलतांसह ते वर्तमानाला सामोरे गेलेले आहेत. तो अनुभव, त्यातील अंतर्गत ताणांसह, त्यांनी समर्थपणे साकार केला आहे. हे तीन अंकी नाटक म्हणजे कोसळू पहाणाऱ्या मध्यमवर्गीय जीवनाला दिलेले तीन छेद होते. स्त्री–पुरुष संबंधाचे विलक्षण विदारक विश्लेषण राकेशांनी या कलाकृतीत केलेले आहे. मागील दोन नाटकांप्रमाणेच या नाटकाच्या केंद्रातसुद्धा मानवी अपूर्णतेची जाणीव स्पंदत असताना दिसून येते. इतकेच नाही तर पूर्वापेक्षा ही जाणीव अधिक प्रगल्भ, अधिक व्यापक आणि अधिक तीव्र झालेली दिसून येते.

पडदा उघडल्यावर आपल्या डोळ्यासमोर येते ती विस्कळित जीवनाचे तुकडे गोळा करून सलगपणे जगू पहाणारी सावित्री. खचलेला, पराभूत झालेला नवरा, वैफल्याने ग्रस्त झालेला तरूण मुलगा, सैरभैर झालेल्या मुली आणि सावित्रीच्या जीवनात आलेले पुरुष हा या नाटकाचा कॅनव्हास आहे. त्यात उपरोधाचे अनेक सूक्ष्म रंग राकेशांनी भरलेले आहेत. पूर्णतेच्या शोधात सावित्री एका पुरुषापासून दुसऱ्याकडे धाव घेते पण सर्वांचे मुखवटे सारखे असल्याचे तिला जाणवते. आपला व इतरांचा 'आधे–अधुरे'पणा तिला उध्वस्त करून जातो. विलक्षण वलांत करून सोडणारी ही जाणीव तिला घेरून टाकते, ऑक्टोपससारखी.

मानवी अपूर्णतेची एक विराट आणि गुदमरवून टाकणारी जाणीव या तीनही नाटचकृतींमधून क्रमाक्रमाने विकसित झालेली दिसून येते. राकेशांच्या भावसृष्टीला या जाणिवेने झपाटून टाकलेले आहे. आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून तिचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण काळाच्या हस्तक्षेपापुढे तोही अपूर्णच राहिला.

□ □

वर्गणीदारांसाठी

ज्यांची वर्गणी संपली आहे अशा वर्गणीदारांनाही 'युगवाणी'चा अंक आम्ही पाठविलेला आहे. कृपया पुढील वर्षाची वर्गणी त्यांनी त्वरित पाठवून 'युगवाणी'वरचा लोभ कायम ठेवावा ही विनंती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनौरस

प्रा. जयंत परांजपे

'अनौरस' ही श्री. उद्धव शेळके यांची नवी कादंबरी. मराठी वाङ्मयाच्या कथा आणि कादंबरी या दोन्हीही शाखांना समृद्ध करणाऱ्या मोजक्या लेखकांत श्री. शेळके यांची प्रामुख्याने गणना होते. बऱ्याच वर्षांपूर्वी 'धग' सारखी कादंबरी लिहून शेळक्यांनी चिकित्सक वाचकांच्याही मनात स्वतःच्या लेखनाविषयी बऱ्याच अपेक्षा निर्माण केल्या आहेत. शेळके आणि 'धग' या दोहोमधे एक अन्योन्यसंबंध निर्माण झाला आहे. 'शेळके' म्हटल्यानंतर 'धग'ची आठवण व्हावी आणि 'धग' म्हटल्यानंतर शेळक्यांची ! इतका हा संबंध दृढ आहे, अतूट आहे. या संबंधामुळेच शेळक्यांच्या कोणत्याही नवीन कादंबरीला सामोरे जाणाऱ्या वाचकाला 'धग'चा संदर्भ सोडून विचार करणेच अशक्य होते. निदान शेळक्यांचा कथा–कादंबरीच्या संदर्भात तरी 'धग' हा एक मानदंडच ठरावा.

शेळक्यांना आकर्षित करणारी माणसं एका दृष्टीने 'सामान्यच' असतात–सामान्य .या अर्थाने की त्यांचे विचार, त्यांच्या भावना, त्यांच्या आकांक्षा या आपल्या भोवती वावरणाऱ्या माणसांच्या विचारभावनांपेक्षा फारशा वेगळ्या नसतात. परंतु शेळक्यांना केवळ व्यक्तीव्यक्तींमधील 'सामान्य'गुणांकडे आपले लक्ष वेधायचे नसते. तर 'सामान्य' वाटणाऱ्या व्यक्तींच्या स्वभावाचे वेगवेगळे पैलू दृष्टीसमोर आणायचे असतात. जीवनाच्या प्रवाहात भेटणाऱ्या असंख्य माणसांपैकी एखादे व्यक्तित्व त्यांना आकर्षित करते. त्यांच्या अंतर्विश्वाचा शोध घेण्याच्या आणि मानवी स्वभावाच्या अंतरंगात शिरून त्याचा तळ गाठण्याचा प्रयत्न करताना या व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांचे असे काही पैलू ते आपल्यासमोर आणतात की, एरवी सामान्य वाटणारी ही माणसं 'असामान्य' ठरू पाहतात;. आपल्या मनावर कायमचा ठसा कोरून जातात.

मनुष्यस्वभावाच्या अंतरंगात शिरून तळाचा शोध घेण्याची ही जिद्द 'धग'मधे दिसते तशीच ती 'अनौरस' मधेही प्रामुख्याने जाणवते. व्यक्तीचा स्वभाव, त्याच्या आशा–आकांक्षा, त्याच्या लैंगिक क्षुधा, समाजजीवनात वावरणाऱ्या व्यक्ती–व्यक्तींमधील परस्परसंबंधातून निर्माण होणाऱ्या ईर्ष्या, यासारख्या भावभावना यांतील तणावातून कादंबरीतील अनेकपदरी गोफ विणला जातो. यामुळेच व्यक्तीच्या जीवनात घडणाऱ्या असंख्य घटना आणि त्या घटनांची बारीकसारीक तपशिलासकट केलेली वर्णने शेळक्यांच्या कथाविश्वाचा अविभाज्य घटक आहेत. घटना आणि त्यांची साद्यंत वर्णने यामुळे कथात्मकतेला बराच वाव मिळतो हे खरे. परंतु मनुष्यस्वभावाचा शोध घेण्याच्या शेळक्यांच्या या वृत्तिविशेषामुळे कथात्मकतेला स्वभावचित्रणाच्या संदर्भात दुय्यम स्थान मिळते.

कादंबरीत विणल्या गेलेला अनेकपदरी गोफ एकत्र आणणारा एक महत्त्वाचा धागा म्हणजे सुखाचा शोध. शेळक्यांच्या या पात्रांना लागलेली ही सुखाची ओढ प्रत्यही जाणवत असते. हे सुख आधिभौतिक नाही, पारमार्थिक नाही, अध्यात्मिक नाही, किंवा अखिल मानवजातीशी निगडित असलेले सुखही नाही. ते कमालीचे 'भौतिक' आहे. व्यक्तीशी निगडित आहे. बरेचसे व्यक्तिकेंद्रित आहे. त्यामुळेच सुखाचा शोध घेणारी, त्यासाठी धडपडणारी व्यक्ती आणि व्यक्तीवर मर्यादा टाकणारी, व्यक्तीला प्रसंगी नाडवणारी नियती यांच्यातील तणावातूनच कादंबरीतील भावविश्व फुलत असते. शेळक्यांच्या कादंबरीमधे तर नियतीला आणि व्यक्ति–नियतिसंघर्षाला एक महत्त्वाचे स्थान प्राप्त होते.

'अनौरस' ही नीलकंठ सानेची कथा आहे. ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर झालेला आईवडिलांचा मृत्यू, इतरांना कःपदार्थ समजणाऱ्या तात्यासाहेबासारख्या श्रीमंताच्या घरात झालेले पालनपोषण, त्या ठिकाणी होणारा मनस्ताप, छळ आणि अपमानास्पद परिस्थितीचा काढा गळ्याखाली लोटून 'इमानी कुत्र्या'सारखं जगावं लागणारं 'जिणं' या सर्वच कारणांमुळे आत्मविश्वास खच्ची झालेला हा नीलकंठ साने सुरवातीला आपल्यां डोळ्यासमोर उभा राहतो. आश्रिताचे जीवन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जगावे लागणाऱ्या व्यक्तित्वाचे हे दर्शन मराठी कादंबरीला फारसे नवीन नाही. नावीन्य आहे ते या परिस्थितीचा नीलकंठ साने या व्यक्तीवर होणाऱ्या परिणामामधे ! तो स्वतःच स्वतःवरील आत्मविश्वास गमावून बसतो. नीलकंठ साने तसा हुशार आहे. कर्तृत्ववान आहे, कामसूवृत्तीचा आहे, बराचसा धडपड्या आहे. मायाच्या रूपाने नियती त्याच्या पदरात एक मोठेच घबाड टाकते. आश्रिताचे जीवन जगणाऱ्या या नीलकंठ सानेला घरजावई झाल्यानंतर संपत्ती, पैसा, घरदार, सुस्वरूप पत्नी यांसारखी लौकिक यशाची गमकेही विनासायास हस्तगत करता येतात. पण नियतीचे हे 'दान' जितके भुलविणारे तितके फसवेही आहे. ही सुखाची साधने अशी विनासायास मिळण्याऐवजी नीलकंठ सानेच्या आयुष्यात त्याच्यावर प्रेम करणारी, त्याला समजून घेणारी मीना देशमुखसारखी स्त्री जर आली असती तर स्वतःच्या कर्तृत्वाच्या भरवशावर ही तथाकथित सुखाची साधने निळूला हस्तगत करणे फारसे कठीण नव्हते.

पण तसे घडले नाही व म्हणूनच नीलकंठ 'अनौरस' ठरला. नीलकंठ सानेच्या या काळातील मनःस्थितीचे प्रत्ययकारी चित्रण याठिकाणी शेळक्यांनी आपल्याला घडविले आहे. आपल्यात काहीतरी कमी आहे, न्यून आहे, आपण 'नेभळट' आहोत, 'बावळट' आहोत, 'नपुंसक' आहोत ही जाणीव हळूहळू इतके व्यापक रूप धारण करते की त्याच्या व्यक्तिगत, लैंगिक आणि सामाजिक जीवनाच्या शाखा-उपशाखांमधे या विषवल्लीची मुळे पसरू लागतात. ज्या ज्या अंगांनी त्याचे व्यक्तित्व फुली फुलोन उठावे त्या सर्वच बाजूंवर एक प्रकारची कृष्णच्छाया पसरते. जणू नीलकंठ सानेच्या आयुष्यातील हे एक ग्रहण हळूहळू सुटू लागते. मीनाचे प्रेम, तिचा स्वार्थत्याग यामुळे किमया घडते. गमावलेला आत्मविश्वास निळूला परत मिळतो. त्याची हुशारी, त्याची तडफ, त्याची कामसूवृत्ती, त्याची कर्तबगारी यांना नव्या वाटा फुटू लागतात आणि सामाजिक मानसन्मान आणि प्रतिष्ठा यांचे एक वलय त्याच्याभोवती निर्माण होते. निळूचे शेवटचे अपघाती मरण आणि त्यानंतर घडणाऱ्या घटना रंगविताना शेळक्यांनी दाखविलेली लेखणीची करामत निश्चितच चित्ताकर्षक आहे. छायेसारखी निळूच्या पाठीमागे जाणारी मीना त्याच्या मृत्यूनंतर सर्वस्व गमावून बसते. निळूवर प्रेम करताना जिने स्वतःचा विचार बाजूला ठेवून सर्वस्वाचे दान केले तिला त्याच्या मृत्यूनंतर झालेल्या दुःखाचे वाटेकरीही होता येत नाही. स्वतःचे दुःख फ्रॉन्सिसला ऐकवताना ती म्हणते।

> 'वाईट वाटतं ते जगावद्दल, कीव येते ती त्याचीच. खोटेच का होईना, वृत्तपत्रांमध्ये सारे उल्लेख तिचे (मायाचे) येत आहेत. फोटो तिचेच येत आहेत. जणू दुःखात तीच एकटी सापडली आहे. माझ्यासारखीचा चुकूनही कुणी उल्लेख करीत नाही. श्रेयस्कर म्हणून तर नाहीच; परंतु हानिकारक–रखेली म्हणूनसुद्धा नाही !'

शेळक्यांची 'सामान्य' वाटणारी पात्रंही 'असामान्य' ठरून जातात ती अशी !

जाताजाता एक–दोन गोष्टींचा संक्षेपाने उल्लेख करावासा वाटतो. कादंबरीतील नीलकंठ साने हे मध्यवर्ती पात्र. त्यानंतरची दोन महत्त्वाची दुय्यम पात्रे म्हणजे माया आणि मीना. या दोघींच्या व्यक्तित्वाचे चित्रण करताना मात्र त्या दोघींवर काहीसा अन्याय झाल्यासारखे वाटते. निष्ठुरता, क्रौर्य, स्वार्थ, अपमतलबी वृत्ती, छचोरपणा, दंभ, उद्धटपणा यांचा ठेका मायाकडे तर स्वार्थत्याग प्रेम यासारख्या गुणांचा वाटा मीनाकडे! या दोनही स्त्री पात्रांचे चित्रण करताना त्यांचा पूर्वेतिहास देऊन कादंबरीकाराने त्यांना आयुष्यातील धनात्मक आणि ऋणात्मक मूल्यांची ही सरळसरळ विभागणी कादंबरीतील नाट्यात्मक संघर्षाला क्षणिक उठाव देणारी असली तरी त्यामुळे निर्माण होणारा कृत्रिमतेचा धोकाही टाळता येण्यासारखा नाही. अशी पात्रे कधीकधी जिवंत हाडामांसाची माणसे वाटण्याऐवजी कादंबरीकाराच्या मनातील काही अमूर्त कल्पनांचे ठोकळे वाटण्याचाच संभव असतो. शेळक्यांनी या दोन्ही पात्रांचा पूर्वेतिहासाशी त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचा संबंध जोडल्यामुळे ती निव्वळ ठोकळेबाज मात्र झालेली नाहीत, हे खरे. परंतु, प्रथमदर्शनी तरी ही गोष्ट खटकल्याशिवाय राहत नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट ही, की व्यक्तीला केंद्रस्थानी कल्पून लिहिल्या गेलेल्या या कादंबरीत रचनेच्या दृष्टीने एकप्रकारची कृत्रिमता आहे. जीवनौघात एखादे व्यक्तित्त्व लेखकाला भेटावे, त्याच्या अंतर्विश्वाचा

[पृष्ठ ३६७ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संध्याछाया !

राजा पाठक

श्री. जयवंत दळवी ह्यांचे 'संध्याछाया' हे नवे नाटक. एका विशिष्ट परिस्थितीतील वृद्ध जोडप्याच्या जीवनातील एकाकी कंटाळवाणेपणाला श्री. जयवंत दळवी ह्यांनी येथे सूत्रबद्ध नाट्यशिल्पाचा आकार दिला आहे. एक पेन्शनर वृद्ध आणि त्याची वृद्ध पत्नी यांची अतिशय करुण गंभीर कथा येथे आढळते. पैसा आहे, सुख आहे, पण पंख फुटताच आकाशात भराऱ्या मारणारी त्यांची पाखरे घरट्याकडे परतत नाहीत. यामुळे निर्माण होणाऱ्या त्यांच्या जीवनातील एकाकीपणाचे विलक्षण वेधक चित्रण या नाटकात आहे; आणि त्यामुळे या नाट्यकृतीवर प्रभाव आहे कारुण्याचा !

एक वृद्ध पेन्शनर. सुखानी संसार केल्याचे समाधान त्याला आहे. तो लोभी किंवा चिक्कू नाही. बायकोवर प्रेम आहे. दोन मुले आहेत. मोठा अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेला तो बरीच वर्षे परत येत नाही. धाकटा हवाईदलांत वैमानिक, लष्करी कडक शिस्तीत व नियमात वागणारा. मुलांच्या भावी आयुष्याची चित्रे रंगविण्यात वृद्ध नाना आणि नानी आपले एकाकीपणाचे कंटाळवाणे आयुष्य विसरण्याचा प्रयत्न करतात. मुलांची आपल्यादेखत लग्ने व्हावीत, त्यांनी आपली विचारपूस करावी, नातवंडे मांडीवर खेळवावीत ही आत्यंतिक जाणीव आणि त्या जाणिवेतून निर्माण होणारे एकाकीपण. अमेरिकेत वास्तव्य करणारा थोरला मुलगा अमेरिकन युवतीशी विवाहबद्ध होऊन तिथेच कायम वास्तव्य करण्याची इच्छा असल्याचा त्याचा निरोप येतो. व ज्याच्यावर सर्व आशाअपेक्षा गुंतून पडल्या असतात तो धाकटा मुलगा भारत–पाक युद्धात मारला जातो आणि त्यामुळे वृद्ध नाना–नानी ह्यांच्या एकाकीपणाला गडद तीव्रता येते. एकाकीपणातून त्यांच्यात निर्माण होणारा मनाचा हळवेपणा व माणूसलोभीपणा नाटककाराने, अज्ञात टेलिफोनवरून एका लहान मुलीशी होणारे नानांचे संभाषण, पेइंगगेस्ट म्हणून येण्याची शक्यता असलेल्या तरुणाशी नाना–नानींची अनाहूत सलगी, या नाट्यमय प्रसंगांनी रंगविला आहे. शेवटी ह्या एकाकीपणाला कंटाळून, धाकट्या भावाच्या निधनामुळे सांत्वनासाठी परत आलेल्या मोठ्या मुलाच्या हातून निदान आपली उत्तरक्रिया घडावी म्हणून नाना–नानी झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्या करतात आणि एकाकीपणाचे हे शोकनाट्य मृत्यूच्या भरतवाक्यात संपते.

म्हातारपणातील एकाकीपण ही अपरिहार्य घटना आहे. पूर्वी खूप केलं आता होत नाही, शरीर पेलत नाही, मृत्यूला चाहूल लागलेली आहे आणि परावलंबी जीवन नकोसे होत आहे, हे सर्वसामान्य वृद्धांचे शाश्वत एकाकीपण असते. पण नाना–नानींचे एकाकीपणाचे दु:ख त्यांच्या सभोवतीच्या परिस्थितीतून निर्माण झालेले आहे. त्यामुळे ते सर्वसामान्य (universal) एकाकीपण नाही. नाटकात नाना–नानी ह्यांची समाप्ती अपरिहार्य ठरते. त्यामुळे 'संध्याछाया'तला शोकांत अंत:करणाला हलवून जातो.

संध्याछायेतील काही प्रसंगांनी वेगळ्याच जीवनानुभवाला रम्य असे नाट्यरूप दिले आहे. ट्रंकेतील भरजरी कपडे बाहेर वाळत काढण्याच्या निमित्ताने आपली थोरली सून भरजरी शालू नेसून कशी दिसेल या कल्पनेत दंग झालेल्या नाना–नानींचा संवाद, ठेवणीतला खास पोषाख घालून दोघांनी रस्त्यावरून जाणारी वरात पाहणे व नवऱ्यामुलाच्या ठिकाणी थोरला मुलगा कल्पून आपण वरमाईच्या थाटात मिरवत जाण्याची त्यांची कल्पना, किंवा सुरू झालेल्या युद्धामुळे वंचित झालेल्या आपल्या धाकट्या मुलाला वैमानिकाच्या पोषाखात नवरदेवाच्या ठिकाणी पाहण्याची कल्पना आणि त्याचप्रसंगी रस्त्यावरून शवयात्रा जाणे, ह्या सर्व नाट्यप्रसंगांनी एकाकीपणाच्या उत्कटतेचा प्रभाव निर्माण झाला आहे. ही कल्पनारम्यतेची झालर नाटकातील स्वभावचित्रणाला अनुरूप असल्यामुळे श्री. दळवींनी फार मोठे यश आपल्या पदरी घेतले आहे. भडक प्रसंग न रंगविता;

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत: १९२३
विदर्भ साहित्य संघ

वृद्ध मातापित्याची एकाकीपणाची विदारक जाणीव त्यांना उन्मत न करता व्यथित करतात ही संयत संवेदना नाटककाराजवळ आहे. श्री. दळवी ह्यांच्या भाषेतील साधेपणा विशेषच वाखाणण्यासारखा आहे.

—आत्मकेंद्रित वृत्तीमुळे व व्यावसायिक निकडीमुळे आपापल्या प्रपंचात पूर्णपणे गुरफटलेल्या मुलांच्या आईबापांचे पोरकेपण व त्या पोरकेपणापोटी त्या वृद्ध आईवापांच्या जीवनात एखाद्या हिडीस प्राण्याप्रमाणे संचार करणारा भावनाशून्य एकटेपणा यांचे अत्यंत करुणास्पद चित्रण जयवंत दळवी यांनी प्रस्तुत नाटकांतून केले आहे. साधेसोपे संवाद आणि मोजकी पात्रे यामुळे या नाटकातील कारुण्य अधिकाधिक गडद होत जाते व शेवटी नाना–नानीच्या मृत्यूनंतर एका विलक्षण सुन्नपणाचा अनुभव प्रेक्षक–वाचकांना देतो. अंतर्मुख करण्याची शक्ती अंगी असणे हे जर उत्कृष्ट कलाकृतीचे लक्षण असेल तर जयवंत दळवींची 'संध्याछाया' ही एक उत्कृष्ट कलाकृती म्हणावी लागेल.

[संध्याछाया : जयवंत दळवी, प्रकाशक : केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुकस्टॉल, गिरगाव नाका; मुंबई. पृष्ठ ८३, किंमत सहा रुपये.]

□ □

[पृष्ठ ३६५ वरून]

लेखकाने शोध घ्यावा आणि हा शोध घेत असतानाच अत्यंत नैसर्गिक पद्धतीने कादंबरीतील भावविश्व फुलत राहावे, तसे घडताना दिसत नाही. अथपासून इतिपर्यंत एखादा कच्चा आराखडा मनांत असावा, आणि त्यानुसार योजनापूर्वक लेखन व्हावे, तसे वाटते. यामुळे होणारा 'रसभंग' पुन्हा एकदा 'धग'च्या बलस्थानाची आठवण करून देतो!

शेळके साहित्याचा विचार करताना 'धग' एक मानदंड मानल्यास 'अनौरस'ला 'पुढचे पाऊल' मानावे इतकी ती समर्थ कादंबरी म्हणता येईल काय? मी फक्त प्रश्नच निर्माण करतो, उत्तर मात्र ज्याचे त्याने शोधावे!

[अनौरस : उद्धव ज. शेळके, पुष्पक प्रकाशन; पुणे, जानेवारी १९७४, पृ. ३४९, मूल्य २५ रुपये.]

□ □

'युगवाणी'तून प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यातील मते संबंधित लेखकाची आहेत. त्या मतांशी विदर्भ साहित्य संघ, संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

वि. सा. संघाच्या सभासदांना 'युगवाणी'चा अंक पाठविला जातो. ज्या महिन्यापासून सभासदत्व स्वीकारले जाईल त्या महिन्यापासून उरलेल्या आर्थिक वर्षाच्या कालात प्रसिद्ध होणारे सर्व अंक त्यांना पाठविले जातील.

केवळ 'युगवाणी'च्या वर्गणीदारांसाठी वार्षिक वर्गणी रु. १५ फक्त. एका अंकाची किंमत अडीच रुपये.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निष्ठा

प्रा. मदन कुलकर्णी

'निष्ठा' ही अशोक श्रीपाद लोखंडे यांची पहिलीच कादंबरी. 'निष्ठे'च्या निर्मितीचे कारण सांगताना लेखक म्हणतात की, "मी जातीय विषमतेच्या अनुभवाची 'विषफळे' चाखली आहेत व त्या विषफळां-द्वारे देहात प्रसवलेल्या वेदनांनी मी शोकग्रस्त झालो आहे. त्यातूनच पवित्र जीवनमूल्यांची निष्ठापूर्वक जपणूक आणि त्याची नव्याने रुजवात करण्याची जरूरी वाटली. त्यातून 'निष्ठे'ने आकार घेतला." भारतीय राज्यघटनेने सामाजिक समतेचा मंत्र आम्हाला सांगितला आणि आमच्या राजकर्त्यांनी ज्या मंत्राचा जप केला त्याला पंचवीस वर्षे झाली तरी ब्राह्मणगाव, बावडा, नान्होरी, शिरसगाव, एरंणगाव इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांशी पशुतुल्य व्यवहार केले जातात ही गोष्ट केवळ दलित व्यक्तीसच नव्हे तर कुठल्याही सुबुद्ध व संवेदनशील व्यक्तींसही पेटविणारी व त्याचवेळी अंतर्मुख व्हावयास लावणारी आहे. ह्याच जाणीवेची पोटतिडीक 'निष्ठे'त पानोपानी जाणवते.

दलित–पददलितांना करावा लागणारा जीवन-संघर्ष हा प्रस्तुत कादंबरीचा विषय आहे. स्पृश्य समाजाकडून आपला मानुसन्मान व हक्क प्राप्त करण्या-साठी त्यांचा चाललेला झगडा हे जसे ह्या कादंबरीचे प्रतिपाद्य तसेच् यशवंत–शेवंतासारख्या तरुण–तरुणींची नवी पिढी निर्माण होताच जातिभेदाच्या दुष्टप्रवृत्तींचा नि:पात होईल हे तत्व प्रस्तुत कादंबरीचे प्रतिपाद्य आहे. दलितांचा संघर्ष चित्रित करताना स्पृश्य–अस्पृश्यांचा लढा, रिपब्लिकन पार्टी दुभंगल्यामुळे त्यात माजलेला कलह, दारूच्या नादी लागून निष्ठावंत मीरेला पायदळी तुडविणारा भगवान्या, मदिरेच्या धुंदीत आत्येबहिणीशी मस्ती करू पाहणारा भद्या, आपल्या समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न करणारा यशवंता इत्यादी व्यक्ती, प्रसंग व घटनांमधून एक सुसंगत कथावस्तू गुंफण्यात लेखक यशस्वी झाला आहे. परंतु दलितांचा छळ रंगवताना बलात्काराचे प्रसंग गडद स्वरूपात रंगविण्याचा लेखकाने केलेला प्रयत्न अस्थानी वाटतो. सुंदरेवर जो प्रसंग ओढवला त्या घटनेनेच कादंबरीला एवढा प्रचंड 'कॅनव्हास' प्राप्त करून दिला आहे की, 'बलात्कारा'सारख्या प्रसंगांचा आधार न घेताही इतर घटनांद्वारे दलित–छळाचे प्रसंग लेखक वर्णन करू शकला असता. प्रतुत कादंबरीचे वाचन करताना प्रारंभीच्या प्रकरणांतून आढळणारी उत्कटता व कथानकाचा ओघ कादंबरीच्या उत्तरार्धात जाणवत नाही. ह्या प्रारंभीच्या प्रकरणांतून स्पृश्यांनी अंधसमजुतींमुळे स्वबांधवांच्या चालविलेल्या छळाचे जे वर्णन लेखकाने केले आहे ते वाचून वाचकाच्या अंतःकरणात भावनांचे प्रचंड वादळ निर्माण होते. त्याला स्वतःला ह्या प्रकाराची खंत वाटते. वाचकाला प्रस्तुत कादंबरी अंतर्मुख व्हायला लावते हे या कादंबरीचे यश मानावे लागेल.

प्रस्तुत कादंबरीत सुंदरा, शंकर, यशवंता, शेवंता, भद्या, भुली इत्यादी व्यक्तिरेखा प्रभावी वाटतात. यापैकी 'भुली'सारखी स्त्री यशवंताच्या केवळ एका उपदेशानं सुधारते हा योगायोगच मानावा लागतो.

'निष्ठे'तील संवादातून आलेली भाषा विदर्भात विशिष्ट जातींमध्ये बोलली जाणारी बोलभाषा आहे. निवेदनाची भाषा अर्थातच प्रौढ मराठी आहे. 'तिन्ही सांजेचा भकास अंधक्कार आपली काळी पावलं पुढे रेटीत म्हारवाड्यात प्रवेशला' यासारखी क्वचित वाक्ये निवेदन प्रभावी करतात. श्री. लोखंडे यांनी कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा वापर करून एका ज्वलंत विषयाला वाचा फोडली याबद्दल त्यांचे अभिनंदन! त्यांच्या या पहिल्यावहिल्या कादंबरीत काही त्रुटी जाणवल्या तरी त्यांच्या रूपाने वाङ्मय–क्षितिजावर एक नवीन तारा उदयाला येत आहे याची नोंद मराठी वाचकाला घ्यावी लागेल.

[निष्ठा : अशोक श्रीपाद लोखंडे, वाय्.एम्.बी.ए. प्रकाशन, बल्लारपूर, एप्रिल १९७४, पृ. १७४, मूल्य आठ रुपये.]

□ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे साकारले शिल्प

वसंत खेरडीकर

सौ. प्रमिल वसंत कुलकर्णी ह्यांनी 'असे साकारले शिल्प' हे पुस्तक बालमित्रांसाठी लिहिले आहे. सौ. प्रमिलताईंनी ह्या पुस्तकाला शिल्प संबोधिले आहे आणि अनुक्रमणिकेला क्रांतीचे क्षण म्हटले आहे. मला वाटतं की ह्या पुस्तकाला 'क्रांतीचे क्षण' हे नाव अधिक शोभून दिसले असते.

शाळकरी मुलांचे व्यक्तिमत्त्व मोठे गुंतागुंतीचे असते. त्यातच मुले आणि मुली आपले छंद, आपली शक्ती, आत्मविश्वास, स्वाभिमान, स्वतंत्रपणा, त्यांची विचारशक्ती आणि सारासार विवेकशक्ती पडताळून पहात असतात. त्यामुळे ती आपल्या मतांविषयी वादविवाद घालू लागतात. अशा वेळी अशी अलंकारिक भाषेच्या शीर्षकातील पुस्तके हाती पडली म्हणजे त्यांचा अपेक्षाभंग होतो आणि त्या पुस्तकाविषयी प्रथमदर्शनी मत चांगले होत नाही. लेखिकेच्या मनात ह्याच विचारांचे कवडसे डोकावले असावे व त्यामुळेच त्यांनी आपल्या भावशिल्पांत शिल्प कसे साकार होते ह्याचे स्पष्टीकरण करून टाकले आहे.

मुले अनेक गोष्टी वाचून, ऐकून कल्पनेत घाडसी जीवनाचे जे चित्र उभे करतात ते त्यांना प्रत्यक्षात जगता येत नाही. धर्म, सत्य, अहिंसा, निर्मल पवित्र भक्ती ज्या काळी ज्या स्वरूपाने सांगण्यात येत असत त्या देशकालादि परिस्थितीत पुष्कळ फरक पडल्यामुळे कित्येकांच्या डोळ्यांत त्याचे तेज आता पूर्वीप्रमाणे भरत नाही.

हिऱ्याला नवे पैलू पाडण्यात आल्याने त्याचे तेज दिपवून टाकणारे होते; त्याचप्रमाणे नव्या शिक्षणक्रमात असली शिल्पे अंतर्भूत केल्यानी नीतिधर्म, नीतिशास्त्र, स्वैरचिंतन ह्याचा आत्मप्रत्यय विद्यार्थ्यांना येईल. लहान वयात मनावर घडणारे संस्कार टिकाऊ असल्यामुळे लेखिकेने म्हटल्याप्रमाणे 'अरूपाला रूप आले की कर्तृत्व फुलते–ज्या क्षणी हे कर्तृत्व फुलते, हे चैतन्य हसते, त्याक्षणी अरूपाला मनोहर रूप येते आणि जीवनाचे अप्रतिम शिल्प साकार होते.'

हे शिल्प साकार होण्यासाठी क्रांतीचे क्षण यावयास पाहिजेत. ह्या पुस्तकात एकूण २० क्षण टिपले आहेत. सुरवातीला वाल्मीकि रामायणाची कथा सांगितली आहे. नंतर शांतिनिकेतन, आनंदवनभुवन, ज्योतिबा फुले, पंडिता रमाबाई आणि एकदम महाभारतावर उडी मारली आहे. त्यामुळे गोष्टींना काळखंडाची मर्यादा नाही. त्या जशा वाटल्या तशा मांडण्यात आलेल्या आहेत, असे वाटते. शेवटची कथा पौराणिक असून निवेदनशैली आधुनिक आहे. ह्या विरोधाभासाचा अर्थ लागू शकला नाही. निरनिराळ्या प्रसंगानुरूप लिहिलेल्या कथा एकत्र पुस्तकरूपाने मांडल्यामुळे हे घडले असावे असे वाटते.

लेखिकेने गोष्टींचा फापटपसारा मांडला नाही. त्यामुळे लहान मुलांना गोष्टी वाचताना कंटाळा येणार नाही. भाषा सोपी असली तरी काही शब्द मुलांना बोजड वाटतील. एकूण निवेदनपद्धती काव्यमय, हळवी व भावविवश आहे.

आज आपल्या मुलांना देशासाठी, धर्मासाठी, सत्यासाठी, अन्नासाठी, यशासाठी आणि आपले ब्रीद राखण्यासाठी सर्वभूतहितार्थ 'सत्यं वद धर्मं चर' ही शिक्षा देण्याची समाजाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यकता आहे. अशा पुस्तकाच्या रूपाने चांगले संस्कार बालमनावर निश्चित होतील. सरकार दरबारी मान्यताप्राप्त पुस्तकाला समाजमान्यताही मिळावी एवढे सामर्थ्य लेखिकेच्या लेखनात निश्चितच आहे, त्याबद्दल लेखिकेचे अभिनंदन. त्याचबरोबर पुस्तकाचे प्रकाशक श्री. राजाभाऊ कुलकर्णी यांनी हे छोटेखानी पुस्तक प्रकाशित करून बाल–वाङ्मयात ही मोलाची भर टाकली हेही येथे नमूद करणे अवश्य वाटते.

[असे साकारले शिल्प : सौ. प्रमिळ कुलकर्णी, प्रकाशक : भा. ल. कुलकर्णी, साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर–१२. पृष्ठे–८९, मूल्य तीन रुपये.]

□ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त २२ सप्टेंबर ते १५ डिसेंबर १९७४

गो. स. देहाडराय,
सरचिटणीस

स्मृतिदिन

खालील दिवंगत श्रेष्ठांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. १-१०-७४ कवीवर्य अण्णाजी वोवडे.
(प्रा. या. मु. पाठक यांचे भाषण)

दि. २-१०-७४ महात्मा गांधी जयंती.
(श्री. आनंदराव कळमळकर यांचे भाषण)

दि. २०-११-७४: संशोधक य. खु. देशपांडे.

दि. ६-१२-७४ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन.

श्रीरामचरितमानस चतु:शतीसमारोह

संतश्रेष्ठ श्रीतुलसीदासजी यांच्या तुलसीरामायणाच्या चतु:शताब्दी निमित्त हा समारोह दिल्ली येथील अखिल भारतीय केंद्रीय समितीच्या प्रेरणेने आणि सहाय्याने दि. १२ व १३ आक्टोबर ह्या दिवशी साजरा करण्यात आला. केंद्रीय समितिचे संचालक, डॉ. नगेंद्र, दिल्ली विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख स्वत: मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. समारोहाचे उद्‌घाटन महाराष्ट्र विधान सभेचे सभापती माननीय श्री. शेषराव वानखेडे ह्यांच्या शुभहस्ते झाले. पहिल्या दिवशी डॉ. कमलाकांत पाठक यांनी प्रास्ताविक भाषण केले. प्रा. भ. श्री. पंडित ह्यांनी 'तुलसी-रामायणातील सौंदर्यस्थळे' ह्या विषयावर व्याख्यान दिले. श्रीतुलसीदासजींच्या 'रामचरितमानस' या ग्रंथाचे अपूर्वत्व व श्रेष्ठत्व विषद करणारे श्री. शेषराव वानखेडे ह्यांचे भाषण झाले. संघाचे उपाध्यक्ष श्री. त्रि. गो. देशमुख यांनी आभाराचे भाषण केले व पहिल्या दिवशीचा कार्यक्रम समाप्त झाला.

त्यानंतर दुसरे दिवशी तुलसी साहित्यावर परिसंवाद योजिला होता. अध्यक्षस्थान पंडित शिवकरणजी शर्मा छांगाणी यांनी विभूषित केले होते. सौ. कालिंदी मनोहर ह्यांनी प्रारंभी श्रीतुलसीजींच्या गीतांचे गायन केले. नंतर पुढीलप्रमाणे भाषणे झाली- प्रा. माणिकराव बेतुले (विषय - कवित्त रामायण) प्रा. सौ. दमयंती पांढरीपांडे (विषय-गीतावली), प्रा. डॉ. कमलाकांत पाठक (विषय-विनयपत्रिका)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. डॉ. रामचंद्र मिश्र (विषय–श्रीकृष्ण गीतावली). पंडित छांगाणी ह्यांच्या विद्वत्तापूर्ण समारोपानंतर हा परिसंवाद समाप्त झाला.

संध्याकाळी श्री. आ. रा. देशपांडे ह्यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. दा. ना. आसमवार यांचे 'श्रीतुलसीरामायण आणि श्रीसंत एकनाथकृत भावार्थरामायण' या विषयावर भाषण झाले आणि श्री. नरहरिदास तल्हार ह्यांनी तुलसी रामायणाच्या स्वकृत भाषांतरातील निवडक भागांचे पठन केले. अध्यक्षीय समारोप व श्री. अत्रे यांच्या आभार प्रदर्शनानंतर हा समारोह संपन्न झाला.

ह्या समारोहप्रसंगी तुलसीरामायण व त्यावरील मराठी व भिन्नभाषी पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केले होते. त्याचे उद्घाटन माननीय श्री. शेषराव वानखेडे यांनी केले.

सन्माननीय वैदर्भीय साहित्यिकांचा सत्कार

या वर्षी प्रा. श्री. वसंत वऱ्हाडपांडे, श्री. प्रभाकर पुराणिक व सौ. प्रमिला कुलकर्णी यांना त्यांच्या ग्रंथांबद्दल महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला. तसेच श्री. ल. रा. कुळकर्णी, श्री. वि. स. जोग, श्री. श्री. मा. घटाटे व श्री. सुधाकर मोगलेवार ह्यांना नागपूर विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्राप्त झाली. त्याबद्दल दि. २४ ऑक्टोबरला भारताचे कृषिमंत्री माननीय बाबू जगजीवनराम यांच्या शुभहस्ते त्या सर्वांना शाल व श्रीफल अर्पण करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

काव्यवाचन

दि. २९ नोव्हेंबरला सुप्रसिद्ध कवियित्री पद्मा गोळे यांचे कवितावाचन झाले. दुसरे दिवशी एक अनौपचारिक परिचय कार्यक्रमही झाला.

संगीत व चित्रकला समिती

'पाच कवी, पाच चित्रकार व एक समीक्षक' असा अभिनव 'पोस्टर पोएट्री'चा कार्यक्रम २६ ऑक्टोबरला आयोजित केला.

नवोदित कलाकारांनी आयोजित केलेले 'मंत्र' या विषयावरील चित्रकला प्रदर्शन ८ नोव्हेंबरला झाले.

संघ मंदिरात संगीत समितीला (स्वमंडळ) स्वतंत्र खोली देण्यात आली. तिच्या प्रवेशाचा आणि नामफलक लावण्याचा समारंभ अखिल भारतीय किर्तीचे ख्यातनाम गायक, पद्मश्री श्री. मल्लीकार्जुन मन्सूर ह्यांच्या शुभ हस्ते १४ नोव्हेंबरला संपन्न झाला.

नाट्यसमिती

खाली दिलेले कार्यक्रम झाले:—

२८–९–७४ : 'रंगभूमीला चित्रकलेचे योगदान' या विषयावर श्री. भाऊ समर्थ यांचे व्याख्यान.

६–१०–७४ : सुप्रसिद्ध नाट्य व सिने कलावंत डॉ. श्रीराम लागू यांचे 'नवे नाटक नवे प्रश्न' या विषयावर व्याख्यान.

५–११–७४ : रंगभूमी दिनानिमित्त श्री. बाळ पांडे लिखित 'गारुडी' नाटकाचा प्रयोग.

१५–१२–७४ : नाट्य दिग्दर्शक व कलावंत श्री. आत्माराम भेंडे यांचे 'फार्सीकल नाटके' या विषयावर व्याख्यान.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत: १९२३
विदर्भ साहित्य संघ

कार्यकारी मंडळाची सभा

कार्यकारी मंडळाची पाचवी सभा दि. २४-११-७४ ला झाली. प्रा. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे यांनी कार्यकारिणी सदस्यत्वाचा आणि युगवाणीच्या संपादक पदाचा राजीनामा दिला. तो त्याबद्दल खेद प्रदर्शन करून मान्य करण्यात आला. वर्षअखेर पर्यंतची संपादन व्यवस्था संघाध्यक्षांनी करावी असे ठरले.

नवीन आजीव सभासद

(१) श्री. भास्कर लक्ष्मण कुळकर्णी, (२) डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर, (३) सौ. कांति श्रीधर मंडलेकर.

शाखावृत्त

१ डिसेंबर रोजी विदर्भ साहित्य संघाच्या दारव्हा शाखेचा उद्घाटन समारंभ यवतमाळ येथील प्रा. गोविंदराव देशपांडे यांचे हस्ते व संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. नीलकृष्ण देशपांडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. संस्थेचे खालील कार्यकारी मंडळ व पदाधिकारी नियुक्त करण्यात आले.

अध्यक्ष—श्री. शं. गु. कणीकर. उपाध्यक्ष—श्री. शं. वा. खानझाडे. कार्यवाह—श्री मधुकर शा. वल्लाळ. सभासद—सर्वश्री ह. प्र. सेता, सु. श्रा. मांडवगडे, सौ. निर्मला महात्मे व नीलकृष्ण देशपांडे (पदसिद्ध)

शाखा उद्घाटन प्रसंगी श्री. शं. वा. खानझोडे यांनी शाखेला रु. १०१ व श्री. ह. प्र. सेता यांनी रु. ५१ ची देणगी जाहीर केली.

इतर शाखांची कार्यवृत्ते ह्या कार्यवृत्ताच्या कालांत आली नाहीत.

परीक्षा समिती—सूचना

विदर्भ साहित्य संघाच्या 'मराठी' परीक्षा येत्या १ फेब्रुवारी १९७५ पासून सुरू होत आहेत. ह्या परीक्षेचे संपूर्ण साहित्य १५ जानेवारी १९७५ ला पाठविल्या जाईल. केंद्राधिकाऱ्यांकडे हे साहित्य पोहोचताच त्यांनी ते बरोबर आहे की नाही हे तपासून त्या संबंधात असणाऱ्या अडचणी लवकरात लवकर संचालक, परीक्षा समिती, वि. सा. संघ, नागपूर १२ यांच्याकडे कळवाव्यात.

□ □

'युगवाणी'च्या दिवाळी अंकावरील मुखपृष्ठ श्री. दि. के. मनोहर यांचे आहे. अनवधानाने त्यांचे नाव नमूद करण्याचे राहून गेले. क्षमस्व. —कार्यकारी संपादक.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

‘युगवाणी’च्या संपादनासंबंधी निवेदन

प्रा. वसंत वऱ्हाडपांडे ह्यांनी कार्यकारी मंडळाच्या सदस्यत्वाचा आणि ‘युगवाणी’च्या संपादक पदाचा ान्नामा दिला. तो कार्यकारी मंडळाने स्वीकृत केला आणि नवीन संपादकाची निवड होईपर्यंत संपादनाचा पुरता भार संघाध्यक्षाने सांभाळावा असे ठरविले.

साधारण सभेने ‘युगवाणी’च्या संपादनासाठी १९७४-७५ ह्या वर्षाच्या ‘अंदाज पत्रका’त रुपये वीस ना राची तरतूद केलेली आहे. तिचे उल्लंघन न करता, आणि सध्याची भाववाढ लक्षात घेता चारशे पृष्ठातच ा अंक काढणे संभाव्य आहे असे दिसले. यंदाचा दिवाळी अंक धरून आतापर्यंतच्या चार अंकात ३८७ पृष्ठे र्ची पडलेली आहेत आणि वीस हजारापैकी शिल्लक रकम सरासरी तीन हजार राहिली आहे म्हणून हा अंक २ पानाचा काढावा लागला. पुढचा अंकही असाच लहान काढावा लागेल. ही विकट परिस्थिती, विदर्भ साहित्य घाच्या सभासदांनी, युगवाणीच्या लेखकांनी आणि वर्गणीदारांनी ध्यानात घेऊन युगवाणीवर लोभ कायम ठेवावा नम्र विनंती.

युगवाणीच्या संपादकाच्या राजिनाम्याविषयी अनेक विपर्यस्त विधाने केली जात आहेत. त्यांत काहीच थ्य नाही. त्या विषयी सविस्तर खुलासा करण्यात युगवाणीची पाने सध्याच आटविणे योग्य नाही. म्हणून तो ला नाही. परंतु आवश्यकता दिसल्यास तो देण्यात येईल. एकपक्षी प्रचारावर कोणी विश्वास ठेवू नये ही म्रा विनंती.

आत्माराम रावजी देशपांडे, अध्यक्ष

मौज प्रकाशन गृह : रौप्यमहोत्सवी वर्ष

- **प्रसिद्ध झाले : आनंद ओवरी** : कादंबरी : दि० बा० मोकाशी : रु० ८-००
- **छापत आहेत**
  ढग : कथासंग्रह : सखा कलाल, **श्री० ना० पेंडसे : लेखक आणि माणूस** : चरित्र : एक मित्र, **राजा लिअर** : शोकांतिका : शेक्सपियर; भाषांतर : विंदा करंदीकर; प्रस्तावना व टीपा : गो० वि० करंदीकर, **‘काळा सूर्य’ आणि ‘हॅट घालणारी बाई’** : दोन लघुकादंबऱ्या : कमल देसाई, **नक्षत्रांचे देणे** : कवितासंग्रह : आरती प्रभु, **सात सक्कं त्रेचाळीस** : कादंबरी : किरण नगरकर, **वासनाकांड** : नाटक : महेश एलकुंचवार.
- **आगामी : सहवास** : व्यक्तिचित्रे : कु० द० दीक्षित

सविस्तर सूचीसाठी लिहा :

मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४०० ००४

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशीराणी चौक, नागपूर-१२.
मुद्रक : म. प्रां. वनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर-१२

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्यकारी मंडळाची सभा

कार्यकारी मंडळाची पाचवी सभा दि. २४–११–७४ ला झाली. प्रा. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे यांनी कार्यकारिणी सदस्यत्वाचा आणि युगवाणीच्या संपादक पदाचा राजीनामा दिला. तो त्याबद्दल खेद प्रदर्शन करून मान्य करण्यात आला. वर्षअखेर पर्यंतची संपादन व्यवस्था संघाध्यक्षांनी करावी असे ठरले.

नवीन आजीव सभासद

(१) श्री. भास्कर लक्ष्मण कुळकर्णी, (२) डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर, (३) सौ. कांति श्रीधर मंडलेकर.

शाखावृत्त

१ डिसेंबर रोजी विदर्भ साहित्य संघाच्या दारव्हा शाखेचा उद्घाटन समारंभ यवतमाळ येथील प्रा. गोविंदराव देशपांडे यांचे हस्ते व संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. नीलकृष्ण देशपांडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. संस्थेचे खालील कार्यकारी मंडळ व पदाधिकारी नियुक्त करण्यात आले.

अध्यक्ष—श्री. शं. गु. कणीकर. उपाध्यक्ष—श्री. शं. वा. खानझाडे. कार्यवाह—श्री मधुकर शा. वल्लाळ. सभासद—सर्वश्री ह. प्र. सेता, सु. श्रा. मांडवगडे, सौ. निर्मला महात्मे व नीलकृष्ण देशपांडे (पदसिद्ध)

शाखा उद्घाटन प्रसंगी श्री. शं. वा. खानझोडे यांनी शाखेला रु. १०१ व श्री. ह. प्र. सेता यांनी रु. ५१ ची देणगी जाहीर केली.

इतर शाखांची कार्यवृत्ते ह्या कार्यवृत्ताच्या काळात आली नाहीत.

परीक्षा समिती—सूचना

विदर्भ साहित्य संघाच्या 'मराठी' परीक्षा येत्या १ फेब्रुवारी १९७५ पासून सुरू होत आहेत. ह्या परीक्षेचे संपूर्ण साहित्य १५ जानेवारी १९७५ ला पाठविल्या जाईल. केंद्राधिकाऱ्यांकडे हे साहित्य पोहोचताच त्यांनी ते बरोबर आहे की नाही हे तपासून त्या संबंधात असणाऱ्या अडचणी लवकरात लवकर संचालक, परीक्षा समिती, वि. सा. संघ, नागपूर १२ यांच्याकडे कळवाव्यात.

□ □

'युगवाणी'च्या दिवाळी अंकावरील मुखपृष्ठ श्री. दि. के. मनोहर यांचे आहे. अनवधानाने त्यांचे नाव नमूद करण्याचे राहून गेले. क्षमस्व. —कार्यकारी संपादक.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी'च्या संपादनासंबंधी निवेदन

प्रा. वसंत वऱ्हाडपांडे ह्यांनी कार्यकारी मंडळाच्या सदस्यत्वाचा आणि 'युगवाणी'च्या संपादक पदाचा राजीनामा दिला. तो कार्यकारी मंडळाने स्वीकृत केला आणि नवीन संपादकाची निवड होईपर्यंत संपादनाचा तात्पुरता भार संघाध्यक्षाने सांभाळावा असे ठरविले.

साधारण सभेने 'युगवाणी'च्या संपादनासाठी १९७४-७५ ह्या वर्षाच्या 'अंदाज पत्रका'त रुपये वीस हजाराची तरतूद केलेली आहे. तिचे उल्लंघन न करता, आणि सध्याची भाववाढ लक्षात घेता चारशे पृष्ठातच सहा अंक काढणे संभाव्य आहे असे दिसले. यंदाचा दिवाळी अंक धरून आतापर्यंतच्या चार अंकात ३८७ पृष्ठे खर्ची पडलेली आहेत आणि वीस हजारापैकी शिल्लक रकम सरासरी तीन हजार राहिली आहे म्हणून हा अंक ३२ पानाचा काढावा लागला. पुढचा अंकही असाच लहान काढावा लागेल. ही बिकट परिस्थिती, विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांनी, युगवाणीच्या लेखकांनी आणि वर्गणीदारांनी ध्यानात घेऊन युगवाणीवर लोभ कायम ठेवावा ही नम्र विनंती.

युगवाणीच्या संपादकाच्या राजिनाम्याविषयी अनेक विपर्यस्त विधाने केली जात आहेत. त्यांत काहीच तथ्य नाही. त्या विषयी सविस्तर खुलासा करण्यात युगवाणीची पाने सध्याच आटविणे योग्य नाही. म्हणून तो दिला नाही. परंतु आवश्यकता दिसल्यास तो देण्यात येईल. एकपक्षी प्रचारावर कोणी विश्वास ठेवू नये ही नम्र विनंती.

आत्माराम रावजी देशपांडे, अध्यक्ष

मौज प्रकाशन गृह : रौप्यमहोत्सवी वर्ष

- **प्रसिद्ध झाले : आनंद ओवरी** : कादंबरी : दि० बा० मोकाशी : रु० ८-००
- **छापत आहेत**
  ढग : कथासंग्रह : सखा कलाल, **श्री० ना० पेंडसे : लेखक आणि माणूस** : चरित्र : एक मित्र, **राजा लिअर** : शोकांतिका : शेक्सपियर; भाषांतर : विंदा करंदीकर; प्रस्तावना व टीपा : गो० वि० करंदीकर, **'काळा सूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई'** : दोन लघुकादंबऱ्या : कमल देसाई, **नक्षत्रांचे देणे** : कवितासंग्रह : आरती प्रभु, **सात सक्कं त्रेचाळीस** : कादंबरी : किरण नगरकर, **वासनाकांड** : नाटक : महेश एलकुंचवार.
- **आगामी : सहवास** : व्यक्तिचित्रे : कु० द० दीक्षित

सविस्तर सूचीसाठी लिहा :

मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४०० ००४

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशीराणी चौक, नागपूर-१२.
मुद्रक म. प्रां. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर-१२

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी [Yugwani] Regd. No. 1174 M H

सोनेरी मुकुट,
लाल गंधाचा टिळा,
शेंदरी सोंड, डावी,
सोंडेत हिरव्या दुर्वा,
गळयात लाल फुलांची माळ,
हातात पांढरा शुभ्र मोदक,
जरीकाठी पिवळा पितांबर,
आणि पाटाशेजारी श्यामवर्णी वाहन
रंगच रंग

नेरोलॅक
रंग–आपल्या जीवनातील एक अविभाज्य अं

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ